

# सूर्य दिसत राहील तोपर्यंत...

## डॉ. सुनील सावंत

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिलेल्या कविता

# सूर्य दिसत राहील तोपर्यंत....

डॉ. सुनील सावंत

वंदना
प्रकाशन
मुंबई

सूर्य दिसत राहील तोपर्यंत... / मराठी काव्यसंग्रह / डॉ. सुनील सावंत

---

**Surya Disat Rahil Toparyant / Marathi Poetry Book / Dr. Sunil Sawant**

**प्रकाशन क्र.** : १३

**प्रथम आवृत्ती** : ७ मार्च २००२
**पुर्नमुद्रण** : १७ जानेवारी २००५
**दुसरी आवृत्ती** : ३० नोव्हेंबर २०२४
© **सर्व हक्क स्वाधीन** : सौ. सुचिता सुनील सावंत

**प्रकाशक :**
**डॉ. सुनील सावंत**
**वंदना प्रकाशन,**
६०४, चंद्रदर्शन
आर. के. वैद्य मार्ग,
दादर, (प.), मुंबई - ४०० ०२८.
**भ्रमणध्वनी : ९८१९१८२३२९**

ISBN : 978-93-80248-13-4

**ई-बुक प्रकाशन :** डिसेंबर २०२४

**मुखपृष्ठ / अक्षर जुळणी**
**चैतन्य आर्टस्**
दादर,(प.), मुंबई- ४०० ०२८.

**मुद्रक :**
**श्री. अंकुश उकारडे**
**पॉप्युलर ऑफसेट प्रिन्टर्स**
लोअर परेल,
मुंबई - ४०० ०१३.

**मूल्य : ₹ २५०/-**

---

**ऋणनिर्देश**
कवी नारायण सुर्वे, कवी मंगेश पाडगांवकर, कवयित्री शांताबाई शेळके, कवी ग्रेस, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, श्री. दिनकर गांगल, बाळ राणे, श्रीकांत आंब्रे, श्री. विनोद पाटील, नंदा साळवी,

# आभार

## सूर्य दिसत राहील तोपर्यंत...

या पुस्तकाचे सर्व हक्क डॉ. सुनील सावंत यांचेकडे आहेत.

सूर्य दिसत राहील तोपर्यंत... या काव्य संग्रहाची ही तिसरी आवृत्ती आहे. ई साहित्यावर पहिल्यांदाच वितरीत करण्यात आली आहे. ह्या पुस्तकाचे ई साहित्यावर हे पहिले प्रकाशन आहे.

हे पुस्तक ई साहित्यवर विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही डॉ. सुनील सावंत यांचे मनःपुर्वक आभार मानतो. या पुस्तकाच्या विनामूल्य ई वितरणाची परवानगी दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान वंदना प्रकाशन, मुंबई यांचे मनःपूर्वक आभार मानते.

हे पुस्तक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचवावे **(Forward and viral)** अशी विनंती आम्ही सर्व वाचकांना करतो.

कवितांवरील आपले अभिप्राय

डॉ. सुनील सावंत यांना **98191 82329** या क्रमांकावर कळवावे.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

# ‘‘गंध’’

कवीमित्र श्री. सुनील सावंत यांच्या या कविता म्हणजे त्यांच्या आजवरच्या काव्यलेखनाचा अधिक वैविध्यपूर्ण असलेला आणि आजच्या कालखंडातील संमिश्र ताणतणावांनी व्यापलेल्या संवेदनाक्षम मनाचा शोधच आहे.

तसे या अफाट मुंबई महानगरीचे आजचे जीवन अधिकच भीषण, नीरस व कमालीचे जीवघेणे होत चाललेले आहे. दिसायला मात्र या शहराला आधुनिकतेनं पूर्ण वेढलेलं वाटेल, परंतु डौलदार व अनुकरणशील कृत्रिम किरटेपण किंबहुना करंटेपणाही जाणवेल. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या या शहरातील नागरिकांच्या पाठीवरचे विसाव्या शतकाचे जुनाट ओझेही कायमच आहे. माणुसकीचे दर्शन, त्यातील एकमेकांना सोबत करीत, विकसित होणारे सांस्कृतिक मन हे सर्व नष्टच होणार की काय? असे तीव्रतेने वाटणारे आजच भयाकुल वातावरण आहे हे खरेच. या सर्वांचे चित्रण अधिक सक्षमतेने ही कविता जशी करते, तितकीच ती याही संघर्षशील व जीवघेण्या लढाईत स्वअस्मितेचा, माणसातील आंतरिक आत्मीयतेचा ओलावा टिकवून धरणारा, म्हणजे कवी सोहीरोबा अंबियेच्या शब्दात सांगायचे तर ‘अंतरीचा दिवा मालवू नको रे’ हा उच्चारही टिकवून धरते. हा उद्गार माणसाला आतून टणक करणारा, बळ वाढवणारा आणि पोलादी हिंमत देणारा आहे.

परंतु या कवितेत इतकेच चित्रण आहे असेही नाही. या रचनांमधील विविध दर्शने फारच विलोभनीयही आहेत. कौटुंबिक ताणतणाव, पालक आणि बालक यांचा प्रेमळ संवाद, सामाजिक आक्रोश, स्त्रीविषयीची अतिशय नाजूक व रेखीव वर्णने, आजच्या राजकीय घडामोडीवरची अर्थपूर्ण शब्दात केलेली टीका-टिप्पणी, मते व मतांतरे, असे कितीतरी सादपडसाद काव्यसंग्रहात आहेत. आधुनिकता न सोडताही आपले भारतीयत्व टिकवले पाहिजे हा आग्रह, तरल संवेदना व स्पष्ट मतांना दिलेले काव्यरूप मुळातूनच वाचण्यासारखे आहे.

आणखी एक, हा कवी आपले ग्राम जीवनही विसरत नाही. गावातील निसर्गमय वातावरण, जुन्या आठवणी, खेडूत जीवनातील नाट्य व विविध व्यक्ती या सर्वांचा स्वरमेळही या रचनांमध्ये आहे. ग्रामीण बोलीतील दोनचार कविता मोठ्या खुमासदार ढंगात व्यक्त झाल्या आहेत. कवी आता नगर वृत्तीचा झाला तरी त्याचे ग्रामीण जीवनातील संस्कार त्याला टळत नाहीत, हेच खरे. हे एक प्रकारचे काव्यसत्वच आहे. कवितेची सर्वांगाने घडण म्हणतात ती ही अशी प्रकट होते.

आजच्या काळात जगतांना जाणवलेले संवेदनांचे सर्व स्पर्श या संग्रहात शब्दांकित झालेले आहेत. असा एक सुरेख शब्दमेळ, किंवा स्वरमेळ जमून आलेला आहे. माझ्या शुभेच्छा.

**दि. १४ ऑक्टोबर २००१, मुंबई** **– नारायण सुर्वे**

# "फुले"

श्री. सुनील सावंत यांचा हा कवितासंग्रह मी वाचला. त्यांच्या कविता विचार करायला लावणाऱ्या, अंतर्मुख करणाऱ्या आहेत. आपल्या भोवतीचे सामाजिक – राजकीय जीवन ते संवेदनशील मनाने न्याहाळतात. या जीवनात माणसाच्या हिताची बीजे आहेत की अहिताची याचा खोल विचार करतात. सभोवतालची ही परिस्थिती भीतिदायक आहे. श्री. सुनिल सावंत या वास्तवाकडे डोळे उघडे ठेवून बघतात.

तू नोकरी करशील तिथे भ्रष्टाचार शिकवतील,
तू हे सोडून हिमालय गाठण्यासाठी जाशील
तर तुलाच मारून रक्त पितील
एक थेंब मिळालं तरी !
न्यायाने वागणाऱ्यांना क्षुल्लक ठरवतील,
अन्यायाविरूध्द लढणाऱ्यांना नष्ट करतील !

श्री. सुनील सावंत यांचे चिंतनशील मन हे वास्तव पाहून सवंग घोषणा देत नाही, कुठल्याही इझमचे झेंडे मिरवत नाही, हे मन स्वतःकडे पाहायला लावते, अंतर्मुख करते :

पण वाटसरूंना नको मारू या,
जातीयतेला ठार करू या,
मगच सर्वांचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल
आणि समस्त जनतेचा वनवासही संपेल,
तेव्हा आधी अंगावरील घाण
स्वतःच्या हाताने स्वच्छ करू या !

श्री. सुनील सावंत यांची ही अंतर्मुखता क्रांतीच्या सवंग घोषणा देणाऱ्यांना रूचणारी नसली, तरी तिची अर्थपूर्णता विचारी मनाला जाणवते.

श्री. सुनील सावंत यांच्या कवितेतून व्यक्त होणारी स्त्री नटवी, सुखासीन बाहुली नाही. समतेच्या नव्या युगाची ती प्रतिनिधी आहे. तशी नटवी, सुखासीन बाहुली असणे, हेच पुरुषाला हवे आहे, याची तिला जाणीव असल्यामुळेच, "मी तुला आवडते म्हणजे माझं काय आवडतं?" असा स्पष्ट प्रश्न ती विचारते. आपल्या व्यक्तिमत्त्वाची प्रखर जाणीव ही स्त्री व्यक्त करते.

तुझा हात हवा, तुझी साथ हवी,
पण मला अबला समजू नकोस,
मी सुध्दा तुझ्या खांद्याला खांदा लावून चालतेय !

श्री. सुनील सावंत यांची नव्या युगाची जाणीव या उद्‌गारांतून प्रकट होते. या जाणिवेमुळे ते अवतीभवतीचे कठोर वास्तव पाहून निराश होत नाहीत :

भावनेचा एक अंकुर जपणाऱ्या
बालकाच्या बंद मुठीला सलाम !

श्री. सुनील सावंत यांची भाषा सरळ साधी आहे. शाब्दिक युक्त्यांवर तिचा भर नाही. तिचे बळ तिच्या आशयात ती शोधते. कविता आपल्या विकासाच्या वाटचालीतून आपल्या भाषेचे रूप शोधीत जाते. श्री. सुनील सावंत यांच्या कवितेची भाषाही भविष्यात नवी नवी सर्जनशील रूपे शोधील असा मला विश्वास वाटतो. असा विश्वास वाटावा अशीच त्यांची आजची कविता आहे.

**दि. १४ नोव्हेंबर २००१, मुंबई** **– मंगेश पाडगांवकर**

## अर्थ / डॉ. सुनील सावंत

अतिशय सुंदर
रंगरुप- आकाराच्या
वेगवान तत्वाच्या
अनंत ध्येयाने वेढलेल्या
सूर्यकिरणांना प्रतिबंध करणाऱ्या काचेच्या
गुबगुबीत गादीच्या मुलायम स्पर्शातून
पृथ्वीभ्रमण करण्यासाठी
टोयॉटो मोटारीत सुध्दा
अन्नपुरवठा संपत आल्यावर रोज
पेट्रोल भरावे लागतेच !
पुन्हा पुन्हा भ्रमण करण्यासाठी !

अगदी तसाच
रोज अर्थ भरावा लागतो जीवनात
सूर्य दिसत राहील तोपर्यंत !

नाहीतर मोटार गॅरेजमध्ये
कमी असतात का गाड्या ?
दुरुस्तीसाठी वाट बघत थांबलेल्या !

≈

## अमानवी राजदूत / डॉ. सुनील सावंत

स्वतःच्या मनाला आणि देहाला स्वतःनेच
साखळदंडाने करकचून बांधून घेणे
केवळ जगातील अनैतिकतेचा निषेध म्हणून
एक अगम्य व्यायाम आहे !

आभाळाच्या निरभ्र निळाईवरील
इंद्रधनुष्याचे रंग पुसण्यासाठी
केवढे सामर्थ्य व बळ एकवटायला हवे
ह्याची कल्पना वादळाने मांडलेल्या
पावसाच्या आकांत-तांडवालाही नसते
म्हणूनच क्षितिजाच्या दक्षिण टोकापासून
पृथ्वीच्या उत्तर ध्रुवापर्यंत अखंडपणे -
तो इंद्रधनु पसरलेला असतो यथेच्छ !
तो आपोआपच अवकाशात अकस्मात
विलिन होऊन जातो - मागे काहीही खुणा न ठेवता !

अनैतिकतेची व्याख्या वाळवीसारखी
संपूर्ण देहाला पोखरु शकते -
पण ती भावना संपूर्ण शरीरात अंकुरली तरच
- मनाच्या अंगणात स्वविश्वासाचा पिंपळ वृक्ष
सहज अवाढव्य बुंध्याचा आकारत जातो
तेव्हाच लीलया प्रबळ नात्यांचे जाळे
विणले जाते -
अन्यथा नैतिकतेचे संदर्भ लावत
मनाला व देहाला कुठे कुठे साखळदंड बांधणार ?
मानवाचे - संपूर्ण शाश्वत अस्तित्वच
नैसर्गिकरित्या प्रामाणिक उरल्याशिवाय !

अनैतिकतेचा निषेध म्हणून
मनाला व देहाला
घातलेले बंधन
कधीही आसवांना पाझर फोडणार नाही

मग उरेल ती स्वतःचीच फडफड
नैतिकता–अनैतिकता मानणाऱ्यांची !
बाकी सारे उडताना दिसतील –
अवाढव्य विश्वाच्या मोकळ्या आभाळावर
रात्री पुरते विसावणारे
बंधला बंधन न मानणारे अमानवी राजदूत !

≈

## माझ्या तरुण मित्रांसाठी अनावृत्त पत्र / डॉ. सुनील सावंत

माझ्या प्रिय तरुण मित्रांनो
हे अनावृत्त पत्र

लक्षात घ्या, तुम्ही तरुण आहात तारुण्यात पदापर्ण करणारे
दहावी इयत्तेत शिकत असाल
किंवा कॉलेजमध्ये जात असाल
तुमचे मन आणि तन तारुण्याने रसरसलेले आहे ....
तेंव्हा सावधान !
शांतपणे त्या तारुण्याचा उपभोग घ्या–ऋतू संपणार नाहीत !
आणि आठवून बघा
तुमची आई !
ज्या आईने भरलेल्या मेघांचे तुमचे ओझे
नऊ महिने सांभाळलेय – तुमच्या नकळत !
हे तुम्हांला कळेपर्यंत अजून काही काळ जाईल –
म्हणूनच हे पत्र
कारण काळ जाईल तोपर्यंत वेळही निघून गेलेली असेल –
तुम्ही स्वतःला सांभाळायची

अगदी खरं आहे
की स्त्रीचे यौवनातील सौंदर्य
वसंताची बहार आहे –
मनात कारंजे उडविणारी !
पण म्हणून ह्या विश्वात तुमच्या बरोबरीने वागणाऱ्या
मुलींना – स्त्रियांना पाहताना –
डोळ्यात माया असू दे
मनात वात्सल्य असू दे
तनाला संयमित ठेवण्याचे सामर्थ्य असू दे !

सौंदर्याला फक्त सुखद न्याहाळायचे
आभाळ–समुद्राचे नाते असू दे !
उफाळून येणारी नश्वर वासनेची लाट नसू दे –
किनाऱ्यावर फुटणारी आणि
किनाऱ्याला भुसभुशीत करणारी !

असू दे हिमालयासारखी शांत लहर
मनमनांतून अखंड विश्वातील मुलींना – स्त्रियांना
पुरुषांच्या मित्रत्वाची साक्ष पटविणारी
आई आणि मुलगा, बहीण आणि भाऊ, मित्र–मैत्रीण हे नातं जपणारी !

तरुण मित्रांनो,
माझे हे अनावृत्त पत्र
तुम्ही वाचा, तुमच्या मित्रांना कळवा
आणि आचरणात ही आणा
ह्या विश्वातील 'आई' अस्तित्वात राहण्यासाठी,
एवढीच कळकळीची विनंती,
कळावे,
लोभ असावा.

≈

## अणूरेणू / डॉ. सुनील सावंत

लैंगिक संबंधाचे अणूरेणू
मेंदूतून समूळ नष्ट केल्याशिवाय
निष्पाप दृष्टीचा सूर्य
तेजावलये पसरवणार नाही
शय्या सजविणारी फुले रानोमाळ उमलत नाहीत !
ह्याचे भान रंध्रारंध्रात भिनायला हवे
स्वप्ननगरीतून परीकथेत पोहचताना
स्वत्वाची जाण असायली हवी
'आपल्या' परीघात राहूनच
केंद्रबिंदूशी प्रामाणिक राहायला हवे
परीघ कितीही वाढवता येतो
पण केंद्रबिंदू वाढले की
वर्तुळे वाढतात – खोटेपणाची !
आणि इथेच भेगाळतात क्षितिजे मनाची
मग उरतात अमावस्येच्या
अंधारलेल्या रात्री
कधीतरीच चांदण्या
शय्या सोबत करतात
निसर्गनियमानुसार –
मनाच्या एकात्मतेचे पक्षी
कधीच सातासमुद्रापार उडालेले असतात
आणि अजूनही दुराव्यातून
सामाजिक बंध न तोडता
जगण्याची सीमा अस्तित्वात असल्याने
कर्करोगासारखे मन पोखरणारी
परदेशस्थ संबंधाची नाती – बेमालूमपणे
तोडता येत नाहीत – कठोर होऊन !

म्हणूनच पुन्हा एकदा उजळणी होऊन
– आपल्या जगण्याच्या परिसीमा ठरविणेच
आपले मध्यबिंदू निश्चित करु शकतील !
अन्यथा उधळलेल्या वादळाच्या
उधाण लाटा मनाला आवरु शकणार नाहीत
खोटेपणाने पोखरलेले हृदय
सांधता येणार नाही
खरे नैतिक संबंध जोडता येणार नाहीत
मनाला आणि जीवनाला
कधीच आनंद देता येणार नाही
म्हणूनच संबंधाच्या परिभाषा
निश्चित करुन वागायला हवं –
संबंधात निस्सिम प्रेम राहण्यासाठी !

≈

## मानव जातीला सलाम / डॉ. सुनील सावंत

जिथे समजून सांगायला लागतात भावना
अशा माणसांच्या दुनियेला सलाम !

जंगलातीलच आदिमानव होऊन वावरताना
सुसंस्कृत विज्ञानाचे मुखवटे पांघरलेल्या दुनियेत
वास्तव चुरगळत जगणाऱ्यांना सलाम !

मनाचा दाह अशांत असतो पैशाच्या बाजारात
शरीराची गरज भागवणाऱ्या दुनियेत
वर्षानुवर्षे नाती जोपासणाऱ्यांना सलाम !

अनाकलनीय मानवी मनाचा–जीवनाचा शोध लावत
स्वतःशीच भांडायला लावणाऱ्या दुनियेत
गूढ स्वार्थाच्या विळख्यात सापडलेल्यांना सलाम !

महत्वाकांक्षा आणि आशा – अपेक्षांची भातुकली मांडून
लग्न दुनियेतील खोटीच बाहुली आणि खोटाच भावला
न समजलेल्या विवाहित जनसमुदायाला सलाम !

स्वर्गसुखाच्या कौटुंबिक मृगजळाआडून नीतिमत्ता उखरत
कृत्रिम पावसाच्या वर्षावाने समाजात मणभर बहणाऱ्या
भूछत्रा एवढेच आयुष्य सजवलेल्यांना सलाम !

लोक हो,
मानवी देहाच्या प्रत्येक अवयवाला सलाम
कोमात जाऊन कुजणाऱ्या शरीराला सलाम
जमिनीत गाडल्या जाणाऱ्या मृतदेहाला सलाम
विद्युतदाहिनीत जळणाऱ्या शरीराला सलाम !

मृत शरीराचे लचके तोडणाऱ्या गिधाडांना सलाम
सलाम ! सलाम ! सलाम – मानव जातीला सलाम
मानवी जीवनाच्या अदृश्य निसर्गाला सलाम !

मानवाच्या तांत्रिक – वैज्ञानिक प्रगतीला सलाम
मानवाच्या डॉट कॉमला सलाम
भावनेचा एक अंकुर जपणाऱ्या
बालकाच्या बंद मुठीला सलाम !

सलाम
मानव जातीला सलाम !

≈

## गर्भाशयाच्या उदरात / डॉ. सुनील सावंत

मेघांनी जडावलेला ढग कधी बरसेल
किंवा ओझे उतरविण्यासाठी पुढे नकळत सरकेल
आणि मोकळं झालेलं आभाळच दृष्टीस पडेल
किंवा कधी भयाण काळोख दाटून येईल
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

आंब्याच्या झाडावरील पिकलेला रसाळ आंबा
सुवर्णपदक मिळवणाऱ्या नेमबाजांनाही पडणार नाही !
अन् लाकडाची मोळी घेऊन जाणारा वाटेवरचा वाटसरु
दगडाने त्याला सहज पाडून कधीतरी घेऊन जाईल
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

वाहत्या ओढ्याचं नितळ निर्मळ पाणी
कुठल्या नक्षत्रातील पावसाचं होतं – ते –
ओंजळीतून पिताना ओळखता येणार नाही
तहानलेल्या पाखराला कुठे कुठला झरा पाणी पाजेल
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

ज्या ज्या जातीच्या घरट्यात त्या त्या जातीचे पाखरे
बिनचूक विसावताना कातरवेळी दिसतील
कोकीळा मात्र कधीतरी कुहूकुहू गात अलवार
कावळ्याच्या घरट्यात चोरुन अंड घालेल
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

तारांच्या पिंजऱ्यात ठेवलेलं एक डौलदार घरटं
अन् त्यात वावरणारे रंगीत पक्षांचं जोडपं
झुल्यावर झुलणारी ती दोघं चोचीतून सूर फेकून
पिंजरा उघडल्यावर कुठल्या दिशेला उडतील
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

संगीतमय दोन कबुतरे, तिसरे कबुतर आसपास पाहून
चावा घेईल तिसऱ्याच्या डोक्यावर, त्यातला नर समाधी सोडून
अन् पुन्हा ती मादी त्याच नराला बरोबर ओळखून
रवणीचे रक्षण करायला कशी व कधी बसेल
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

रानमाळावर दगड धोंड्यातून मोकळी हुंदडणारी
कोंबडी व तिची पिल्ले, दाणे शोधताना – टिपताना
घार आली तर दडवेल ती कोंबडी पंखाखाली पिल्लांना
अन् गुरगुरत धावेल घारीवर वा कोंबड्यांवर सुध्दा !
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

पावसाने चिंब भिजून गारठलेली गोठलेली चिमणी
छताच्या कोपऱ्यात आडोशाला अंग चोरुन बसेल
शुक् करुन कुणी उडवणार नाही ह्याची खात्री करुन
हळूच उतरेल उंबरठ्यावर आणि माजघराचा केंव्हा ताबा घेईल
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

अनंत कष्ट करुन जाळ्यात सापडलेले मासे
होडीवर उतरवताना जाळे सांभाळून पलवटताना
काळजी घेतली नाही मृतावस्थेतील जिवंत माशांची
तर त्यातील छोटे छोटे मासेही कधी उडी मारुन जातील
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

वासराचे हंबरणे ऐकून गाय जशी धावते
दूध देणाऱ्या पावलांशी मांजरही घोटाळते
गंध भरल्या शब्दांने संगीत – मनाला भावते
अशी कशी गट्टी दृष्टी मनाची जमते
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

काश्मिरी, गुलाबी, नारंगी, पिवळे गुलाब पाहताना
सगळेच गुलाब मोहून टाकतात अदृश्य मनाला
घराच्या ओट्यावरील गुलाबाला गोंजारावे – ओरबडावे
त्याला पाणी घालावे, त्याच्याशी खेळावे– बोलावे
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

राजबिंड राजहंस घननिळ्या तळ्यात असावा
बदकांच्या थव्यात आकर्षून घेणारा दिसावा
निशिगंधाचे निर्माल्य भुंग्याच्या भाग्यात असावे
जादुई ती मोहाची तनात कशी उमलावी ?
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

काजऱ्याचे कुंपण कुणी घराला घालत नाही
मुखवटे धारकांना साथ सृष्टीची जन्मभर लाभत नाही
शब्दांच्या अक्षता द्याव्यात समंजस फुलझाडांना
आयुष्य दान करावे, हवेला कवेत घेणाऱ्यांना
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

प्रत्येक जन्मामागे असते एक गर्भाशय
त्या गर्भाशयाच्या उदरात गूढरम्य वास्तव असते
अखंड विश्व निर्मिणारी शक्ती कुणाला उकलणार नाही !
तोपर्यंत मानवी जीवनाचा गूढ रम्य अर्थ उमजणार नाही !
हेही कळणार नाही
तशीच ती – अनाकलनीय !

≈

## सुसंस्कृत मार्गाने ! / डॉ. सुनील सावंत

अदृश्य जंतूंचा एक समूह
बिनशरीराचा
नकळत अनेक फुलांवरुन
घोंगावत असतो –
पाकळ्यांना, किती उमलू द्यावं
व 'लाजाळू' सारखं पानांनी केंव्हा मिटावं
हे स्वत्व जिथे फुलांना कळतं
तिथेच बाग बहरत राहते
नाहीतर अवेळी पतझड येते !

धुळीच्या कणांचा स्पर्शसुध्दा
'लाजाळूला' पाने मिटण्याची संवेदना देतो
त्यावेळी बिननात्याचे ऋतू
आपोआप विरघळून जातात–
–अदृश्य वासनांना जाळून
टाकणारा 'पानमिटीचा' ऋतू
प्रत्येक फुलात वास्तव्याला येईल
आणि निराकार प्रणय
शोधणारे भुंगे
जेव्हा अनंत फुलांवर भिरभिरणारी दृष्टी
एकाच फुलातील मधावर केंद्रित करतील
तेंव्हा निसर्गातील बहार अधिक मधाळ होईल –
अन् ग्रीष्मातही फुलेल – गुलमोहरासारखी !
आणि विराण बागांमध्ये 'उंबराचे फूल' दिसेल !

त्यासाठी मनाला ग्रहण लावणारे विषाणू
नष्ट करण्याची महाकाय शक्ती
प्रत्येक मानवात निर्माण करणारा
अजस्त्र 'हनुमान'
एकविसाव्या शतकात
मानवाच्या तनात रुजायला हवा
मानवी मनातील संसर्गजन्य भोग किटाणूंचा
नाश करण्यासाठी

संगणकीकरणाने मानवी मनात उत्क्रांती
होणार नाही....
संयमाची अवाढव्य शक्ती
एकविसाव्या शतकाकडून मानवी संस्कृतीत भिनल्याशिवाय
बागांमधील अराजकता थांबणार नाही !
मानवी मन 'विशुध्द' होणार नाही !
अदृश्य जंतूचा एक समूह
वळवळायचा थांबणार नाही !
प्रगतीचे चक्र शेवटी आदिमानवाकडेच वळेल
सुसंस्कृत मार्गाने !

≈

## सुगंध / डॉ. सुनील सावंत

मित्रांनो,
ज्वालामुखी होऊन तुम्ही या
किंवा नवीन भूखंड होऊन तुम्ही या
पण घरातील दुर्गंधी आधी संपवू या !

तुमचा उद्रेक इतकाच पेटलेला असेल
तर चक्रीवादळ होऊन या म्हणजे एखादं गावच नष्ट होईल
अन् कदाचित त्याबरोबर विश्वाच्या घरातील जातीयतेची दुर्गंधी संपेल !

मित्रांनो,
आधी घर स्वच्छ करु या
मगच बाहेरच्या सुगंधाची अपेक्षा करु या
नाहीतर बाह्यजग कितीही सुधारले,
तरी त्याचा सुवास आपल्याला येणार नाही !

मित्रांनो ,
रामायण लिहिण्याचा अट्टाहास सोडू या
पण वाटसरुंना नको मारु या,
जातीयतेला ठार करु या !
मगच सर्वांचा भविष्यकाळ उज्ज्वल होईल
आणि समस्त जनतेचा वनवासही संपेल
तेव्हा आधी अंगावरील घाण स्वतःच्या हाताने स्वच्छ करु या !
मगच बाहेरील सुगंधाची अपेक्षा करु या !

≈

## मी मरणावर जिंकलो ! / डॉ. सुनील सावंत

असा मरणातुनी जगण्यावर मी हासलो
पहाटेच्या वंदनातुनी असा मी सावरलो !

तुझ्या प्रीतीच्या शब्दांनी असा मी बहरलो
अनाथ प्रवासी मी, किरणांच्या मार्गावर आलो !

तुझ्या सहवासातुनी मी हासण्यास शिकलो
जपून ठेव तयास, मी आता पुरता गुंफुनी गेलो!

असा तुझ्या आधाराच्या शब्दांसाठी मी जगत आलो
हातात हात घेण्यास परि, कधी ना धजावलो !

तुझ्या स्पर्शासाठी मी कधीच ना आतुरलो
तू म्हणालीस 'माझा' तेंव्हा मी तुझा ऋणी झालो !

तुझ्या श्वासात प्रिये मी नकळत अडकलो
आता मेलो तरीही तुजसाठी राणी जगलो !

तुझ्याच चरणी आता मी अनंतात विलीन झालो
तुझा हा युगांचा ऋणी, मी मरणावर जिंकलो !

≈

## नातं ! / डॉ. सुनील सावंत

घर नावाची नोकरी
संबंधित असते घरातील प्रत्येकाशी
घरातील प्रत्येकाचं अस्तित्व
एकमेकांच्या अस्तित्वाशी निगडीत असतं
प्रत्येकाच्या बाह्य जगातील
आचरणाचा-बोलण्याचा अंकुर
घर नावाच्या सूर्यप्रकाशानेच वाढत असतो.
म्हणूनच सशक्त भावनांचे पाणी
घरातील अघोषित नोकरीत घराच्या मातीतून
जिरवायचे असते
विश्वासाची फुले फुलविण्यासाठी !

बाह्य जगातील नोकरीच आता
'घर' करु लागलीय मनामनातून
आणि बहुमुल्य घर-संस्कारांची नोकरी
सहजपणे वितळून गेलीय पैशाच्या नायट्रिक खतात.
म्हणूनच 'घराचा' सुपीक एकत्रितपणा
ढासळू लागला - बाह्य जगातील
कृत्रिम पाऊस वर्षावणाऱ्या वागण्यात.

क्षणभर वसंत फुलतोय खोटा !
तरीही बाह्य जगच आता 'घर' झालंय पैशापायी
आणि पैशाविना सुसंस्कृत विचार
पिकवणारे घर नष्ट झालंय.
बाह्य जगातील स्वातंत्र्य उधळायच्या कल्पनेने !

घराच्या बागेला नीटनेटकं
ठेवणारी माळी व माळीणच
आता बाह्य जगातील बागांना
पाणी देऊ लागलीत

तेंव्हापासून घर नावाचं रोपटं
नवीन बीजांकुरांना सुध्दा
खुरटेपणाने वाढवू लागलंय
आणि घराची बाग
बाह्य जगातील प्रगतीपथावरील
बदलाने होरपळून गेलीय की बदलून गेलीय !
खरा जीवनातील आनंद मावळून गेलाय !

घरात म्हातारा माळी असला,
तरी रोपटी वाढतात -
त्याच्या मायेच्या अस्तित्वाने.
पण घरातील बागेचा मालक-मालकीण
आता ठेवतच नाहीत घरात
म्हातारे माळी-माळीण
तेव्हापासून 'घर' सुसाट धावतंय
वारेमाप -
रानोमाळ हुंडारणाऱ्या गुरांसारखं
आणि वाट चुकलेल्या वासरासारखं
दबून गेलंय रानाच्या माळावर !

पैसा नावाच्या पगाराची पुंजी
घरातील प्रत्येकाला देता येत नाही.
तरीही घराची बाग बागच ठेवायची असते !
पण बाह्य जगातील पैसामय वातावरणात
सगळे विसरुन गेलेत -
घराचं नाजूक मुलायम रेशमी नातं
अन् घरातील आपलं अस्तित्व !
तेव्हापासून घर परकं झालंय
घर वाट पाहातंय - आश्रयदात्याची !

≈

## पावलोपावली दारुण पराभव / डॉ. सुनील सावंत

पावलोपावली
मानवतेचा, कायद्याचा, सुव्यवस्थेचा आणि समाजाचा
दारुण पराभव

भर रस्त्यात पेटविले जाते एका स्त्रीला
आणि स्व–कोषात असतो समाज गुरफटलेला
तो माझा विभाग नाही, हे सुव्यवस्थेचे कायदे गात
आपआपल्या कामाला निघून जातात सगळे चणे खात !
पावलोपावली दारुण पराभव

ट्युशन क्लासला अजिंक्यपद मिळवून देण्यासाठी
गुणवत्ता यादीतील त्या क्लासमध्ये नसलेल्यांसाठी
लाखोंची फुलमाळ दिली जाते 'जाहिरात' जगामध्ये
तरीही पुराव्याअभावी गुन्हा दाखल होत नाही न्यायालयामध्ये !
पावलोपावली दारुण पराभव

लोकशाहीत शाळेतील शिक्षण मुलींना मोफत असते
वह्या, पुस्तके व युनिफॉर्म शाळेतून घेण्याची सक्ती असते
दरमहा अनेक रुपातून शाळा अशीच फी उकळत असते
ह्या बिनपावतीच्या हिशोबासाठी पुढे कुणी न सरसावते
पावलोपावली दारुण पराभव

शाळा कॉलेजमध्ये कमी टक्क्याला प्रवेश मिळत नाही
देणगीशिवाय शिक्षणाला कुठेच पर्याय उरलेला नाही
गरीबांसाठी पत्राद्वारे अभ्यासाची दारे सर्वत्र उघडलेली !
कॉम्प्युटर युगात पत्रे लिहून पालिकेची कचराकुंडी भरलेली
पावलोपावली दारुण पराभव

न्यायालयाची युनियनला सुयोग्य विरोध करण्यासाठी साथ नाही
काम नाकारणाऱ्या कामगारांना काढून टाकण्याची हिंमत नाही
गुणवत्ता व शिक्षणाची टोलेजंग नोकरी सहज उपलब्ध नाही
शेतकऱ्यांना कर्जाशिवाय शेतीसाठी पाणी मिळत नाही !
पावलोपावली दारुण पराभव.

≈

## तिची कधीही तक्रार नसते / डॉ. सुनील सावंत

ती थकते
ती दमते,
ठरलेल्या रानात रोज जाते
गर्दीच्या काट्यांतून प्रवास करते
लालशाईने मस्टरवर क्रॉस ही होते
तरीही ती धावती ट्रेन पकडते
पण तिची कधीही तक्रार नसते

ती थकते
ती दमते
अंमळ उलट्याही सहन करते
अनंत यातनांचे ओझे वाहते
शेवटच्या क्षणापर्यंत कामावर जाते
तरीही ती मातृत्वासाठी धडपडते
पण तिची कधीही तक्रार नसते

ती थकते
ती दमते
तिच्याबरोबर तोही पळत असतो
पण कामाच्या व्यापात मग्न असतो
चहाही न करता तो थकतो
त्याची मानसिकता तोच उग्र बनवतो
पण तिची कधीही तक्रार नसते

ती थकते
ती दमते
रोज सन्माननीय पुरस्काराची वाट बघते
हक्काने तिला नेहमीच गौरविले जाते
मायेच्या सन्मानाची सल कुठेतरी असते
तरीही तिला त्याची सोबत हवी असते
पण तिची कधीही तक्रार नसते

ती थकते
ती दमते
त्याने प्राजक्ताचा सडा पेरावा वाटते
समुद्रावरील बेभान लाटेत ती हरवते
पावसाच्या रिमझिम सरींनी ती सुखावते
ती हसते, ती वाट बघते, ती त्याचीच असते !
पण तिची कधीही तक्रार नसते

≈

## भारतीय संस्कृती ! / डॉ. सुनील सावंत

घराबाहेर पडलेल्या स्त्रीने
यथेच्छ मोकळपणाने वागावे
किंवा पुरुषानेही यथेच्छ मोकळे व्हावे
हे एकमेकांनी सहन करण्याची
भारतीय संस्कृती निदान अजून
सुसंस्कृत भारतीय समाजात भिनलेली नाहीय
म्हणूनच घराबाहेरील नाती
दाराआडच बंदिस्त राहिली पाहिजेत !

अन्यथा डोळ्या देखत चारचौघांत
जेंव्हा असंस्कृत शारीरिक चाळे
किंवा शाब्दिक संवाद घडतात
ते अमेरिकन प्रवृत्तीची साक्ष घडवतात.
म्हणूनच घराचं घरपण जपण्यासाठी
प्रामाणिक सुसंवाद स्त्री-पुरुषात हवा
नाहीतर दोघांचंही घराबाहेरील
असभ्य वागणं म्हणजे स्वैराचारच !
एकमेकांनी एकमेकांच्या इच्छेने
समाजाला साक्ष ठेवून केलेला व्यभिचारच !

स्त्री-पुरुषाचं घराबाहेरील वागणं
अलिकडे पाहिलं तर...
मैत्रीच्या पलिकडे भिरभिरताना दिसते
काही अंशी, काही स्थळी...
त्या संबंधाची उकल सुसंवादाशिवाय
कधीच होणार नाही
पती-पत्नी, आई-वडील, शेजारी-पाजारी,
कार्यालयीन किंवा कामावरील साथी,
साथीदार मुले आणि नातेवाईक

ह्यांच्यात प्रामाणिक सत्यावर आधारित
सुसंवाद साधला नाही तर –
सोज्वळ संस्कृती हळू हळू संपून जाईल
आणि उरतील ती नर–मादीची घरे !
केवळ राहण्याची गरज भागवणारी !!

तेव्हा अमेरिकन संस्कृतीकडे वळणाऱ्या
भारतीय समाज व्यवस्थेने
जरी मैत्रीपूर्ण संबंधाचे नाते
समाजात वावरताना वाढवले
तरीही पती–पत्नी ह्या नात्यातील
टिकवून ठेवला पाहिजे विश्वास !

केवळ शारीरिक संबंध
म्हणजे बाहेरील संबंध नव्हेत
घराच्या दारात पोचलेल्या संबंधाना सुध्दा
लक्ष्मण रेषा आखून ठेवली पाहिजे
भावनांना आवर घातला पाहिजे
नाहीतर– इटालियन समाज व्यवस्थेसारखी
रस्तोरस्ती चुंबनासाठी थांबणारी जोडपी
भारतातही दिसू लागतील –

भारतीय संस्कृतीला अमेरिकन संस्कृतीत
ढकलताना
मानवतेचा ऱ्हास होईल का ?
सामाजिक व्यवस्था उद्‌ध्वस्त होईल का ?
ह्याची आपण भारतीयांनी घेतली काळजी
तरच विज्ञान युगाकडे झेपावणाऱ्या भारतातील
सुसंस्कृत समाजव्यवस्थेचा विध्वंस थांबेल
अन्यथा आपण करणार आहोत–नकळत !
भारतीय संस्कृतीचा विध्वंस !!

≈

## तुझ्या रुपाने / डॉ. सुनील सावंत

हल्ली पुन्हा वसंताची बहार
जीवनात येऊ लागलीय... तुझ्या रुपाने
कितीतरी वर्षानंतर..

मला आठवतं...
खूप काही स्वप्ने मी रंगविली होती
शब्दही तसेच अन् वागणंही तसेच
वास्तवात मी जपलेले होते
पण मला अन् माझ्या शब्दांना
कुणी जपलंच नाही !
मी पुन्हा – पुन्हा मृगाच्या सरी होऊन बरसलो
... अगदी आजही !
पण भावनिक फुलांचा वर्षाव नंतर कधी झालाच नाही !

घरटंही सुंदर सजवलं
पण काड्या – काड्या वेचताना
झालेल्या त्रासाची कधी
चिमणीच्या डोळ्यांत आसवंच दिसली नाहीत !
माझ्यासाठी म्हणून आग्रहाने वर्षावणारी !!

मग सारं कशासाठी ? कुणासाठी ?
खरं काय असतं ? शब्द की वास्तव ?
... काही अपेक्षाच करु नयेत का ?
... सतत इतरांसाठीच जगावं का ?
... आपल्यासाठी कधीतरी ह्या चोवीस तासातील दिवसात
एखादा क्षण देणारं आपलं कुणीच असू नये का ?

मला आठवतं… तसं मी मनाला समजावतो…
राजा, पुन्हा येणाऱ्या कोणत्याही वसंत ऋतूत गुंतू नकोस
येणारा वसंत जर काही क्षणभंगूर निघाला
… तर ते तू सहन करु शकशील का ?
की पुन्हा जसा जन्म झाला तसाच एकटा… !

आपण सगळेच एकटे असतो
… जीवनाच्या अंतापर्यंत
… त्याचेच नाव जीवन,
बाकी सारं जग मृगजळ !!

≈

## पुरुषमित्रा ! / डॉ. सुनील सावंत

मी
मी हवी
म्हणजे माझं काय हवं ?
हा एक प्रश्न ?

तुला मी आवडते
म्हणजे माझं काय आवडतं ?
हा दुसरा प्रश्न ?

तुला माझं नक्की काय हवं ?
तुला माझं नक्की काय आवडतं ?

मी सुंदर आहे म्हणून सौंदर्य आवडतं
मी प्रतिकार करत नाही म्हणून तुला हवीय !
उत्तर नाहीय तुझ्याकडे !
मी नेमकी काय आहे ?
मी कशासाठी आहे ?
ह्याची उत्तर देशील...

मला तू हवास
तुझ्या भावना हव्यात
तुझा हात हवा
तुझी साथ हवी...
पण मला अबला समजू नकोस
मी सुध्दा तुझ्या खांद्याला खांदा लावून चालतेय
तेंव्हा मला तू तुझी समज...
कोणत्याही क्षणासाठी तुझी समज...

म्हणजे माझ्यात बळ प्राप्त होईल
माझ्याकडे बघण्याची दृष्टी बदल...
म्हणजे मी तुझी मैत्रीण होईन
मी तुझी प्रेयसीही होईन
अन् तुझी आईही होईन
इथे नात्यांचे अर्थ समजून घे
म्हणजे माझ्या स्त्रीत्वात केवळ 'स्त्री' म्हणून
पाहण्याचा मोह तुला आवरेल
आणि मी तुझी जिवलग मैत्रीण होईन
तुझ्या मित्रांसारखीच...
हेच माझं खरं अस्तित्व ठरेल
भविष्यासाठी... प्रत्येक स्त्रीसाठी !

≈

## मी, तू आणि विश्व / डॉ. सुनील सावंत

रात्र तुझी
रात्र माझी
चांदणे तू घेऊन जा !
दवपण तू ठेऊन जा !

पहाट तुझी
पहाट माझी
किरणांना तू झेलून जा !
प्रखरतेला तू देऊन जा !

काम तुझे
काम माझे
गाणं तू देऊन जा !
फळं तू घेऊन जा !

जीवन तुझे
जीवन माझे
फुले तू वर्षावून जा !
निर्माल्य तू ठेवून जा !

तू तुझा
मी माझा
सारे प्रवास तू देऊन जा !
अवघे विश्व घेऊन जा !

तू तुझी
मी माझी
वादळलेले क्षण तू ठेवून जा !
संपूर्ण विश्व तू व्यापून जा !

तू आणि मी
तुम्ही आणि आम्ही
सारे आभाळ तू उतरवून जा !
माझी जमीन तू घेऊन जा !

माझं
आणि तुझं
सारं तू कवटाळून जा !
माझं रान तू विझवून जा !

≈

## आजोबांची म्हैस / डॉ. सुनील सावंत

अजून मला
तू पुरतं जाणलेलं नाहीस

आमच्या आजोबांकडे एक म्हैस होती
काही वर्षांपूर्वी
ते सकाळी उठत
आणि तिचं हंबरणं ऐकण्यापूर्वी
तिच्या पुढ्यात पेंडीने भरलेली
पाण्याची बादली ठेवत
मग दुपारी ती निवांत झोपत असे
आजोबा सगळी कामे आटोपून
दुपारी झोपत
पण बरोबर चार वाजता उठत
आणि तिचं हंबरणं ऐकण्यापूर्वीच–
तिला
ओढ्यावर घेऊन जात

जाताना हातात काठी घेत
पण कधीही तिला मारत नसत !
ती कुणाच्याही परसात तोंड घालत नसे
की वाट बदलून चालत नसे !
संध्याकाळी सूर्य डोंगराआड झाला
की ती स्वतःहून ओढ्यातून बाहेर येई
आणि घरच्या वाटेला लागे
ती थेट गोठ्यात आपल्या जागेवर
आजोबा तिला कधीही दावणीला बांधत नसत !

रात्री तिला फणसाची शेड घालत
मग ती शांतपणे खाऊन
आजोबांनी पाठीवरुन
हात फिरवला नी
माझी 'बाय' म्हंटलं की
ती शांत झोपत असे
हा नित्यक्रम तिचा !
तिचं हंबरणं कधीही ऐकू येत नसे !
तेंव्हा आजोबांनी तिला
आणि तिने आजोबांना पुरंत ओळखल्याचं
जाणवत असे !

आणि तू आणि मी
अजूनही हातात हात घालून फिरतो
मनातील हंबरणं मनातच आक्रंदत राहतं !
ओठावर व्यक्ति स्वातंत्र्याचं स्मित असतं
हंबरणं कुणीही थांबवू शकत नाही !
आणि 'बाय' म्हंटलेलं तुला कळत नाही !
तू ह्या अवाढव्य कळपात
विविध प्राण्यांच्या जगात
तुझ्या अस्तित्वाने स्वतंत्र जगतेस !
म्हणूनच मला तू
अजून पुरतं जाणलेलं नाहीस !
आणि कदाचित जाणूही शकणार नाहीस !
जीवनाचं ओझं तूच काय ?
कुणीही उतरवणार नाही !
– सूर्यास्तापर्यंत !

आजोबांची म्हैस व आजोबा मनात घर करुन राहतात !
एकमेकांनी एकमेकांना ओळखल्याची साक्ष देत !

≈

## मुख्यमंत्री / डॉ. सुनील सावंत

सर्व सामान्यांना
परिचित असलेलं सर्वमान्य सर्वोच्च स्थान मुख्यमंत्री पद
असं अचानक हिसकावून घेऊ नये –
तशाच सबळ पुराव्याशिवाय.
नोकरी सोडताना किंवा नोकरीतून काढताना सुध्दा
सरकारी कार्यालयात जशी सूचना द्यावी लागते
तशी निदान काही अवधीची सूचना द्यावी
नाहीतर हे लोकांचं राज्य कुठे उरतं?
ही तर लोकशाहीतील हिटलरशाही ठरते !

किती कार्यक्रमपत्रिका ऐनवेळी बदलल्या असतील
किंवा किती कार्यक्रम रद्द झाले असतील
किंवा किती उद्घाटनांची शिल्पं काढायला लागली असतील
ज्यावर मुख्यमंत्री म्हणून नाव कोरले गेले असेल !

अचानक झालेल्या बदलाने
पेरलेले बीज नवीन ऋतूत अंकुरेल का?
या प्रश्नाने किती जमिनी भेगाळल्या असतील !

मुख्यमंत्र्यांचे मूल्य असावे
सगळ्याच गोष्टी बाजारभावात तोलू नयेत !
तेंव्हा लोकशाहीलाही नववधुसारखं सबुरीने नांदवायला हवं !
लोकांच्या राज्याला सांभाळायला हवं !
पक्षप्रमुखांनी समजायला हवं !
मुख्यमंत्र्याच्या व्यक्तिमत्वावरही राज्य जिंकता येतं –
आजच्या जनतेच्या डोळ्यावर झापडं लावता येणं
– सहज शक्य नाहीय, ह्याचं भान हवं
निदान लोकशाही जगवण्यासाठी
न्यायासाठी, सत्यासाठी !

## लोकशाही म्हणजे.... / डॉ. सुनील सावंत

लोकशाही म्हणजे लोकशाही म्हणजे लोकशाहीच असते
खोबडीतील मेंदू इथे गायब होण्याची शक्यता असते !

लोकशाही म्हणजे तुमची आमची शोकशाही असते
सर्वोच्च निकाल संसदेत बदलण्याची शाश्वती असते !

लोकशाही म्हणजे तुमची आमची कायद्यांची जुगलबंदी असते
स्वार्थासाठी अर्थ बदलून घेण्याची नेत्यांना सुविधा असते !

लोकशाही म्हणजे सत्तेबरोबर फरफटण्याची ग्वाही असते
निरपेक्ष–निःपक्षपाती नेत्यांची किंमत इथे कधीतरीच जोखली जाते !

लोकशाही म्हणजे विचारांची देवघेव करण्याची नाटिका असते
वर्षावर्षात अल्पमताने सरकार पाडण्याची 'कुस्ती' ही असते !

लोकशाही म्हणजे देशाची – राज्याची – लोकांची खरी काळजी असते
सत्तेसाठी हपापलेल्या पक्षांची एकमेकांवर मात्र कुरघोडी दिसते !

लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांकरिता चालविलेले राज्य असते
पन्नास वर्षानंतरही 'जंगल राज्यात' वावरण्याची संधी उपलब्ध असते !

लोकशाही म्हणजे लोकशाही म्हणजे लोकशाहीच असते
सर्वसामान्यांना पायदळी तुडविण्यासाठी मतदानाची सोय असते !

लोकशाही म्हणजे लोकशाही म्हणजे लोकशाही असते
कुणाचा मेळ कुणालाही न लागण्याची रीतसर इथे तरतूद असते !
म्हणूनच लोकशाही टिकते, वाढते, फोफावते आणि सुस्तावते !

≈

## माझ्या मनाला कळत नाही ! / डॉ. सुनील सावंत

माझ्या मनाला कळत नाही
भावना सगळ्यांना उमगत नाहीत
माझ्या मनाला कळत नाही !

अपेक्षांची कस्तुरी मिळत नाही
मृगामागे धावणे सोडत नाही
माझ्या मनाला कळत नाही !

प्रणयाची भाषा समजत नाही
प्रेमाची प्रमेयं सुटत नाहीत
माझ्या मनाला कळत नाही !

हरवलेलं सापडत नाही
ओक्साबोक्शी रडणं थांबत नाही
माझ्या मनाला कळत नाही!

सहजतेने हसता येत नाही
खोटे मुखवटे समजत नाहीत
माझ्या मनाला कळत नाही !

ढोंगी जगात मिसळता येत नाही
वरकरणी आनंद घेता येत नाही
माझ्या मनाला कळत नाही !

दुनियेचे दस्तूर कळत नाहीत
जगणे त्या शिवाय चालत नाही

माझ्या मनाला कळत नाही !
एकमेकाचं कुणीही नाही
माझं इथे कुणीच नाही
माझ्या मनाला कळत नाही !

दुनियेचा संसार रुचत नाही
ही प्रवृत्ती समजत नाही
माझ्या मनाला कळत नाही !

समाजात आनंद वाहत नाही
'आनंद' कधी समजूही शकत नाही
माझ्या मनाला कळत नाही !

एकाच-ऋतूत अडकणे योग्य नाही
हेच मला समजत नाही
माझ्या मनाला कळत नाही !

≈

## निर्माल्य / डॉ. सुनील सावंत

एका गुलाबाच्या कळीला असंख्य मैत्रीणी
एक हसते एक रुसते
हसते तिचं निर्माल्य होतं
निदान कधीतरी !

देवघरात स्थान मिळतं
निदान कधीतरी

गळ्यात अडकता येतं
हार बनून
निदान कधीतरी

केसात विराजमान होता येतं
निदान कधीतरी

वहीतही प्रेमाच्या राहता येतं
निदान कधीतरी

पण रुसते तिचा देहांत होतो
गंधहीन, अर्थहीन पालापाचोळा
मातीत मिसळून जातो
अनंतातील संथ काळोखात
बुडून जातो
– तिचा अनोळखी देह !

≈

## बाप कोण आहे ? / डॉ. सुनील सावंत

तिच्या टवटवीत शरीरावरुन
तुमच्या बुभुक्षित नजरा फिरताना
लाज कशी वाटत नाही तुम्हाला तुमच्या संस्कृतीची ?

तिच्या पोटी जन्म घेऊन नग्नता पसरविणारी तुमची जात
छाटून टाकायला हवीय ?
किंवा तुमच्या नजरांच्या खाचा करायला हव्यात
जपणूक करायला स्त्रीच्या मातृत्वाची !

ही पुरुषजात
मिळेल तिथे ओरबडणारी
अगदी उमलत्या कळ्यासुध्दा !

या मानवाचा बाप कोण आहे ?
ह्याचा शोध आता लागलाच पाहिजे...
ही नग्नता थांबवायला !

## पालापाचोळा / डॉ. सुनील सावंत

''केसांतून फिरणारी बोटे
वेणी घालताना उगीचच आठवतात
गजऱ्याच्या सुगंधात
तुझ्या पालापाचोळ्याच्या कल्पना बहरतात !

पालापाचोळा :
नको असलेल्या पानांचा, झाडांचा काड्यांचा
झाडांनी टाकून दिलेल्या झाडांच्या अवयवांचा

माणूसही असाच
माणुसकीहीन झालेला
म्हणून या पृथ्वीवर कदाचित पडलेला उल्कांसारखा
नाहीतर इथे वसंताचे आगमन झालेच नसते !

पालापाचोळा होऊन पृथ्वीवर माणूस पडलाय !
पालापाचोळा कधी कमी होतो का ?
खरं आहे तुझं,
माणूस हा पालापाचोळा आहे !''

≈

## मुंबईतील गिरणी / डॉ. सुनील सावंत

अजूनही सकाळी नऊ वाजता
गिरणीच्या भोंग्याची बांग
कानी पडते
आणि आठवते मुंबईतील गिरण

गिरणीतील आमचा मामा
वीस वर्षापूर्वी प्रत्येक महिन्याच्या
सात तारखेला घेऊन जायचा दुग्धालयात
पावशेर दूध आणि पापडी द्यायचा
तेंव्हापासून मी सात तारखेची
वाट पाहायचा

आज तोच मामा
गिरणी संपात होरपळून गेलेला पाहतोय मी
तरीही जिद्दीने कपडे शिवतोय तो
आजही घरी येतो तेव्हा सांगतो
काहीही पैसा मिळालेला नाहीय !

मग गगनचुंबी इमारती
आभाळाला मिठी मारुन
गिरण्यांच्या जागेवर
कशा उभ्या राहिल्या ?
हा प्रश्न पडतो मला...
मला प्रश्न सतावतो की
मुंबईतील गिरण्या उद्ध्वस्त का झाल्या ?

गिरण्यांच्या जमिनीतून अंकुरत आहेत – अहितकारी प्रवृत्ती !
मानवाला – मानवतेला त्याच जमिनीत गाडून !

## माझँ मर्द हायसा तुमी / डॉ. सुनील सावंत

''माझँ मर्द हायसा तुमी''
म्हणालीस तेव्हां...
मी हृदयच गुंफून टाकलं तुझ्या जीवात
आणि माझी बायको होऊन
बाजारप्रेमले, या घरात आलीस समाजाच्या !

सुसंस्कृत म्हणवणाऱ्या
आणि भाषणे देऊन दैनिकांचे रकाने भरणाऱ्या
या पापी अन् शिष्ट समाजाने
शिंतोडे उडविले त्यांच्या अतृप्त
अन् कलुषित मनाने या दोन जीवांवर !

पण... या समाजानेच
जेंव्हा तुला पैशाच्या हिशोबात
रात्रीचा सौदा मागितला
अन् तू त्यांच्या थोबाडीत मारलंस
तेव्हांच तू या नवीन समाज रचनेतील
खरी मातब्बर स्त्री शोभलीस !
या नव्या समाज व्यवस्थेच्या उत्क्रांतीची
तू जनक झालीस !

≈

## एक झाड / डॉ. सुनील सावंत

एक झाड
वर्षा ऋतूत सळसळणारं
शिशिरात पतझडणारं
ग्रीष्मात होरपळणारं
निसर्गाच्या नशिल्या ऋतूत
बेमालूमपणे हरवलेलं...
असलेलं.... नसलेलं...
... एक झाड !

त्याच्या सावलीत
कुणीही निजावं
त्याच्यावर
कुणीही शिटावं
त्याची तक्रार नाही

वादळात
उन्मळून पडेपर्यंत
वणव्यात
जळून राख होईपर्यंत !

≈

## गढुळता / डॉ. सुनील सावंत

एकदा झालेली अक्षम्य चूक
नजरेसमोर कधीतरी येऊ शकते
हे सहज विसरता कामा नये !
ती चूक अविश्वासच वाढवते कायमसाठी – स्त्री–पुरुषांमध्ये
आणि रक्तबंबाळ करत राहणे क्षणोक्षणी

असेच असते मानवी मनाचे कोंदण
प्रेममय नात्याचे रेशमी बंध असेच असतात
अशा अविश्वासावर
एखाद्या क्षणी घातलेली फुंकर
केवळ क्षणभरच विसावा देऊ शकते
कायमसाठी ती जखम भळभळतच राहते !

तेंव्हा स्त्रीने आणि पुरुषाने
एकमेकांच्या नात्याला तडा जाईल
अशी चुक करण्याचे टाळावे
– अशा चुका जीवनभरासाठी
आयुष्य उद्ध्वस्त करुन ठेवतात
नंतर कितीही विश्वास भरण्याचा प्रयत्न केला
तरी विश्वास निर्माण होऊ शकत नाही !

विश्वास म्हणजे फुग्यात भरण्याची हवा नव्हे !
जी कधीही फुग्यात भरली की
फुगा हवेत उडायला तयार व्हावा !

विश्वास म्हणजे नितळ पाणी !
एकदा ते गढूळ झाले की
कायम ते गढूळ होत राहणार–वेळेनुसार !
क्षणभर स्थिर होताना निर्मळ होणार
हलले की तळाशी साठलेला गाळ
पुन्हा त्यात मिसळून जाणार
अविश्वासाची गढूळता कधीच विरणार नाही !

≈

## निवांत शांतता ! / डॉ. सुनील सावंत

इथल्या उत्तुंग इमारतीच्या मागे
समुद्र दिसतो
आभाळाशी स्पर्धा करणाऱ्या इमारती दिसतात

आम्ही विविध कार्यालयात नोकरी करणारे
... विविध कारकून ... अधिकारी वगैरे
सकाळपासून संध्याकाळपर्यंत
पैशाच्या व्यवहारात गुरफटलेले
सतत कलकलाट... गोंधळ... कोलाहल !

किती गुंतून गेलोय
पोटासाठी, प्रतिष्ठेसाठी... पैशाच्या स्पर्धेत !

समुद्रात सामावलेली नितांत शांतता
कधी आम्ही पाहिलीच नाही !
पाण्याचे तरंग संथ... शांत... उसळलेले
मोत्याचे दाणे पसरविणारे...

निवांत शांतता इथेच सापडते
... शोधली तर –!

≈

## **शब्द सर्वकर्ता** / डॉ. सुनील सावंत

संपूर्ण विश्वाचे स्वामित्व शब्दांच्या उदरी
बुध्दिबळाची प्यादी नाचतात शब्दांच्या पटावरी

भाषेच्या बंधनाविना शब्दांची किमया न्यारी
दंगल–शांती–प्रेम आणि द्वेष शब्दांच्या पदरी

शब्दांची महत्ता जीवन आणि जग उध्दारी
उद्ध्वस्त करण्याचे अणू त्याच्या रंध्रात भारी

विश्व तराजूची कावडी शब्द संतुलित करी
दोन मने जोडी प्रसंगी तोडी शब्दांची दोरी

शब्दांचे सामर्थ्य घडवी मानवी व्यक्तिमत्व घरोघरी
विश्व आणि मानवाचे मंगल जीवन शब्दांच्या अंतरी

शब्द सर्वकर्ता, शब्द दुःखहर्ता–कर्ता, शब्द भरजरी
शब्द क्रांतीचे पुढारी–शब्द विश्वाची मायावी नगरी !

≈

## इतिहास घडवील काळ / डॉ. सुनील सावंत

कृष्ण सावळ्या मेघांनी दाटून आले अखंड आभाळ
गंध पिवळ्या लोचनांनी पेलवली ओथंबलेली संध्याकाळ

सांजवेळी पावसाने मांडियला घन रिमझिम खेळ
शेतांचे झाले ओढे नी पायवाटेचा लागेना मेळ

सखये, झावळ्यांनी शृंगारुनी घेतले कवेत शहाळं
जास्वंदीच्या रोपावर अनंताच्या फुलांचे बरसे वादळ

क्षणभर मनात रुणझुणली तुझ्या कुजबुजीची वेळ
अन् बांध फोडूनी धावू लागले लहरीचे ओहळ

धुंवाधार पावसात जपूनी ठेवेन पोसावलेली केळ
प्रिये अशाच तुझ्या गंध बहराने उजाडू दे सकाळ

जीवनात हीच हवी पावसाळी होणारी सळसळ
जगणे फुलवील तुझ्या माझ्या मनातील कळकळ

ओलावतील, पाणावतील, बहकतील कुठे डोंगरमाळ
जळूनी गेलो पतंग म्हणूनी, तरी इतिहास घडवील काळ !

≈

## अशी एक राणी / डॉ. सुनील सावंत

नदीच्या किनारी वाहते झुळझुळ पाणी
पाण्याच्या मंजुळ नांदीत अशी एक राणी !

आभाळाच्या माथी दाटी केली करड्या ढगांनी
ढगांच्या माळावरील सावलीत अशी एक राणी !

आजुबाजुला पक्षांची अन् वृक्षांची धावती गाणी
गाण्याच्या तालावर झुले अशी एक राणी !

असतात दाटलेल्या सोबतीच्या आठवणी
सोबतीस असावी प्रीतीत अशी एक राणी !

मनाच्या एकांती पानात असते एक चांदणी
न उमलणारी जीवनी अशी एक राणी !

अनंत सुगंधी पुष्पांची या जगी रहाणी
रहाणीच्या सुखी आनंदात अशी एक राणी !

प्रसन्नतेची एकट्याच्या मनी एक कहाणी
कहाणीत सुंदर मनमोहक अशी एक राणी !

## तुझे हास्य / डॉ. सुनील सावंत

आभाळावर ढग आले
तरी तुझे हास्य
ढगाआडून विश्वात पसरते !

आभाळ पूर्ण मोकळे झाले
तरीही तुझे हास्य
सोनेरी किरणांतून क्षितिजावर येते !

तू कुठेही असलीस
तरीही तुझे हास्य
मनपटलावर उतरते !

मनातून सागरातील लाटांसारखे
संपूर्ण शरीर बहरत जाते
तुझे हास्य – नकळत
माझे जीवन होते
प्रेरणा बनते !

तू नसलीस किंवा
तुझ्या मनात काहीही भाव नसले
तरीही तुझे हास्य मनास खुलविते !
जीवनाला आनंद प्राप्त करुन देते !
असे अनोखे तुझे हास्य !

≈

## आधुनिक कृष्ण / डॉ. सुनील सावंत

सर्वसामान्य जनतेची हिंमत वाढवणारा
कृष्ण पुन्हा एकदा
ह्या पृथ्वीतलावर जन्मास यावा लागेल
सुरक्षित जीवनासाठी
अन्यायाविरुध्द लढण्यासाठी
गुन्हे करणाऱ्या अपप्रवृत्तींना
नष्ट करण्यासाठी – !

द्रौपदीला वाचविणारा कृष्णः
कायद्यातून, पोलिसांमधून आणि सरकारांमधून
समाजाच्या हिताची श्रीमद्भगवतगीता पुन्हा एकदा
प्रस्तुत करण्यासाठी जन्मास यावा लागेल !

जनमानसात धैर्य निर्माण करणारा
... नितिमत्ता वाढविणारा
... न्यायासाठी युध्द पुकारणारा
मनामनातून अपप्रवृत्तींचे उच्चाटन करणारा
कृष्ण खरोखर जन्मास यावा लागेल !

मुलींना आणि स्त्रियांना
समाजात सुरक्षित स्थान मिळवून देण्यासाठी
आधुनिक कृष्ण पुन्हा इथे अवतरावा लागेल !

≈

## युध्द ! / डॉ. सुनील सावंत

झोपेत कुणी युध्द करतं का ?
त्याला योध्दा म्हणतच नाहीत
जीवनाच्या रणांगणावरील रोजचे युध्द
दिवसभर चालतं !
त्या युध्दात स्त्री–पुरुष खेळत राहतात
कधी सारीपाट
कधी बुध्दीबळ
कधी झब्बू !
त्यात आपण कधी झब्बू होतो,
हे कळतच नाही !
युध्द काही संपत नाही–
तह काही होत नाही–
केवळ स्वतःच्या अस्तित्वामुळे,
व्यक्तिमत्वामुळे आणि कर्तृत्वामुळे
तडजोड एकाबाजूनेच नेहमी करायची नसते
शत्रूपक्षाने सुध्दा त्यात अधूमधून सहभागी व्हायचे असते
अन्यथा डाव उधळून पराकोटीला
जाणं कठीण नसतं – तह कधीच होत नाही !

माणसं दूर झाल्याने सहवास दुरावतो–
मानसिक घालमेल संपत नाही !
जीवनाशी मांडलेलं भांडण थांबत नाहीय !
स्वत्व सांभाळून 'तह' करणे वास्तववाद
की 'अहंपणाने' स्वाभिमान टिकविणे आदर्शवाद !

बुध्दीला आणि मनाला शिकवावा अलिप्तवाद
म्हणजे राग, लोभ आणि मोह गळून पडतात आपोआप
थोडा कठीण ऋतू असतो हा–
पण एकदा का भिनला शरीरात की
शरीर व मन होते निराकारी–पूर्णविरक्त !

रणांगणावरील निपचित पडलेल्या शरीरांसारखे
जिवंतपणी जीवन उरते–
सगळं 'ऋतूचक्र' वादळी बनते

उद्‌ध्वस्त झालेल्या गावांचं पुनर्वसन सहज सोपे नसते–
कितीतरी मोठा काळ पुन्हा जावा लागतो–
वसंताची वस्ती वसवायला....
युध्द समाप्तीची घोषणाच तारक ठरते !
केळीचे खांब प्रवेशद्वारात लावायला !

≈

## कीबोर्ड आणि ऑपरेटर / डॉ. सुनील सावंत

महत्वाकांक्षी
स्त्री-पुरुषाने
ठरवून घ्यावेत करार
लग्नापूर्वी !

मैत्री-प्रेम आणि लग्न
तीन पूर्णपणे अलिप्त विभाग.
एकत्रपणे 'फ्लॉपीत' कॉपी करुन ठेवता येत नाहीत !
कीबोर्डशिवाय स्क्रीनवर प्रोग्राम व्यतिरिक्त काही दिसत नाही.
संगणकाचा उपयोग शून्य - !
तसंच असतं लग्न
'कीबोर्ड' एकाने व्हायचं असतं
आणि 'दुसऱ्याने' संगणक ऑपरेटर व्हायचं असतं
अन्यथा संगणकावर फिरत राहतात ते मासे....
पाण्याच्या टाकीशिवाय
जिवंत असण्याचा भास निर्माण करणारे
इतकंच दिसतं -
लग्नानंतर.... जीवनपटलावर !

संगणकावर चुकून अनाहूत कार्यक्रम दिसेल
आणि ऑपरेटरला कल्पना नसेल की ही फाईल कुणी बनविली ?
तर संशयाचा व्हायरस संपूर्ण संगणकाला बंद पाडेल म्हणूनच-
'फाईल' कोणी बनविली ? का बनविली ?
ह्याचा अभ्यासात्मक शोध घ्यावा -
आणि हातात असावा विश्वासाचा 'माउस'
योग्य वेळी योग्य दिशा दाखविणारा -
नको ती फाईल रद्द करणारा !

ठरवायचं मात्र ऑपरेटरने !
दैनंदिन जीवनाच्या मांडणीत
घराची बांधणी करणे
दूरदर्शन पाहत राहण्याइतकं सहज सोपं नसतं !
त्यासाठी माउस फिरवावा लागतो, फाईल शोधावी लागते,
हवा तो मजकूर टाईप करावा लागतो
फक्त 'कीबोर्ड' ने दगा द्यायचा नसतो
आणि ऑपरेटरने अयोग्य बटन दाबायचे नसते !

मग संगणकातील अनेक 'व्हायरस' नष्ट करता येतात–
'कीबोर्ड' व ऑपरेटरने आपल्या निश्चयाशी पक्के राहायचे असते...
मग संगणकावर अनावश्यक अक्षरे उमटत नाहीत
लग्नाची गणिते चुकत नाहीत....
छपाई झालेला मजकूर आपोआपच यथायोग्य उमटतो !
लग्नाचे यश किंवा अपयश !!

≈

## द्रौपदीला वाचवणारा कृष्ण / डॉ. सुनील सावंत

रस्त्यावरुन जाणाऱ्या
एका शाळकरी मुलीच्या छातीवरुन
एका तरुण मुलाने बुलडोझर फिरवला !
ती आकांताने ओरडत होती
आणि आम जनता शांतपणे बघत होती
भर रस्त्यात...
कुणी म्हणत होते,
'त्या मुलाकडे हत्यार असेल'
'तो भोसकेल'
किंवा
'तो मुलगा डोळा ठेवून
आपल्याच मुलीला किंवा आपल्याला
असाच उद्या त्रास देईल'
किंवा
'गुंडाना बोलावून आपल्याला ठार मारेल'
किंवा
'पोलीस ठाण्यात आपल्याला साक्षीदार करतील
आणि नोकरी धंदा सांभाळून अनंत व्याप वाढतील !'

भर रस्त्यात उघड्या डोळ्यांसमोर मानवतेचा खून
आणि द्रौपदीचे वस्त्रहरण होईल...
कृष्ण कुणीच होणार नाही
कायदा आणि पोलीस संरक्षण देऊ शकणार नाहीत
सर्वसामान्य जनतेचं धैर्य खचून जाईल...
आणि सीतेचं अपहरण करणारे रावणच बोकाळतील
द्रौपदीला वाचवणारा कृष्ण आधुनिक युगात
शोधावा लागेल... सर्वसामान्य जनतेला !

≈

## घर नावाचे वर्तुळ / डॉ. सुनील सावंत

माणसाच्या अस्तित्वाचा
निराकार अर्थ
मला समोरच्या पोस्टरमध्ये दिसतोय.
पोस्टरमधील ऐश्वर्याचं चित्र
मला अस्वस्थ करत नाही.
काही क्षण आनंदच देऊन जातं
इथली समाजव्यवस्थाही अशीच
व्यवस्था नसलेला अस्ताव्यस्त समाज !

जिथे मुलांच्या भावना
ऐकत असतात घराच्या भिंती
आणि बंद दारे
तेंव्हा समोरचं ऐश्वर्याचं पोस्टर
डोळे मिचकावीत हसत असतं!

भावबंध संसारात उरलेले नाहीत
भावना फक्त शारीरिक झाल्यात
की जगणं फक्त व्यावहारिक झालेय ?
समोरचं पोस्टर छापणाऱ्या मुद्रकासारखं
की हिरॉईन झालेल्या ऐश्वर्यासारखं !

सारे प्रश्न अनुत्तरित
घर नावाच्या वर्तुळात !

≈

## नवीन आशा / डॉ. सुनील सावंत

रातराणीचा सुगंध आला माझ्या दारी
आठवणींचा परिमल पसरवून गेला उरी

आभाळीचा चंद्रमा उतरला माझ्या नयनी
आसवांचा पाऊस वर्षावून गेला मनी

प्रेमळ किलबिलाट रुंजन घाली कानी
आशीर्वादाने तुझिया प्रेरणा वाढे जीवनी

प्रेमळ शब्द न् हास्य पिंगा घालती भोवती
दिवस कधी संपले हे पहाटे मला सांगती !

पहाटेची किरणे तुझी, ह्रदयात माझ्या उतरती
नवीन आशेच्या ऋतूची पालवी ती फुलवती !

स्वप्नांची परिपूर्ती करणारी तू प्रेयसी
माता ही जरी तू, मैत्रीणीचे नाते जपशी !

≈

## **मृगसरी** / डॉ. सुनील सावंत

अकस्मात येणाऱ्या वळीव सरीसारखं
तुझं आगमन
स्वागतार्ह होतं
म्हणूनच कैफाची रात्र उतरवून
मी तुझ्या घरट्यातील उंबरठ्यावर
पाऊल ठेवले –

पण सखे, त्या घरट्याला विणलं होतं
कावळ्याने अन् माझं कोकिळेसारखं
तिथं झालेलं आगमन
त्या घरट्याच्या काड्या विस्कटणारं ठरलं
अन् वळीव सरी
माझ्या जीवनात मृगसरी होऊन कोसळल्या !

≈

## तो आणि ती / डॉ. सुनील सावंत

अशीच नेहमीची सकाळ असते
धावपळ असते
बस पकडण्याची घाई असते
ट्रेन न चुकवण्याची इच्छा असते
रुसवे असतात, फुगवे असतात
ट्रेन मधून बाहेर बरसणारा पाऊस दिसतो
...सगळ्यांची किती यांत्रिक हालचाल !

काही पावसाळ्यांतील दिवसात
'तो आणि ती' रिमझिम थेंब झेलत
संध्याकाळी कितीतरी वेळ पावसात
पूर्वी कधीतरी भिजलेले असतात
त्यावेळी हृदयात एक स्पंदन असते
पावसाच्या वर्षावाने ते उमलून येते
पुन्हा पुन्हा सोनटक्क्यासारखे !
फुलांच्या सुगंधाने बहरुन जाते
उद्या आणि उद्या भेटतच राहावे
पाऊस अन् थंडी वाढतच राहावी
'तो आणि ती' सहवासातच असावेत
असे ते 'तो आणि ती'चे दिवस असतात !

वयाने काळाने कसे ते दिवस हरवतात ?
कुठे ती ओढ निघून जाते ?
'तारुण्याची पालवी' फुलण्याचेच दिवस
मनाला अंकुरतात अन् व्यवहाराचे दिवस
हळूहळू मनाला ग्रीष्मातील ऊनाकडे झुकवतात...

‘तो आणि ती’ हरवून जातात...
गर्दीत, कामाच्या व्यापात,
घरातील रहाटगाड्यात...
संसारात, सुखात अन् दुःखात

नवीन ‘तो आणि ती’
त्यांना दिसतात
ही सुध्दा अशीच गुंफुंण जाणार का ?
या विश्वचक्रात...

पाऊसही निघून जातो
हिवाळाही जातो
ग्रीष्मातील ऊनाची झळ सतावतं राहते
स्वतःसाठी मोकळे क्षण, मोकळे दिवस
या जीवनाच्या विश्वचक्रात उरतच नाहीत
उरतात त्या आठवणी
अन् नवीन पाखरांच्या हालचाली !

‘तो आणि ती’ या यांत्रिक जगात
मनाला कधीच हरवून बसतात
एखाद्या क्षणी मन बहरुन येते
उफाळून येते
आसवांनी भरुन जाते
उद्याच्या काळजीने पुन्हा ते बरसून जाते !

‘तो आणि ती’ व्यवहाराने संपून जातात
पूर्वीच्या दिवसांचे अर्थ लावत,
रात्री अंथरुणावर अंग टाकतात..
... सकाळी लवकर उठायला हवं !

≈

## देवळातल्या सप्त्याक / डॉ. सुनील सावंत

रायत हल्ली झाडा नायहत
बावडेर राठ नाय हा
इल्ल्यापासून मी बघतयं,
नदयेर पन जायत नाय !
मग भेटतलंस खय माका ?

बघ देवळातलो आज सप्त्याचो
शेवटचो दिस हा,
थय तरी भेट... किती वरसानं इलयं मी !
...परकर – पोलक्यात माका थयचं भेटलं हुतंस !

आज तुका शोधलय सप्त्यात
मगे इचारलय काळश्याक–
''बावडेत पडान मेला ना रे ता''

अवास्तव ओढ हयच कुस्करली
मगे देवळात जावन बसलय
एकटोच,
माझ्या जावच्या वाटेर...
... वाटंच संपली हुती !

≈

## मालक / डॉ. सुनील सावंत

हे माझं काही नाही
जगातील सारं तुमचं आहे
माझ्यामागे मालकही तुम्हीच आहात
मोठ्या मनाने मानलं तर सारं तुमचंच आहे !
अन्यथा इथे येणाऱ्या
प्रत्येक पक्ष्यांचं घरटं वेगळं आहे
भाषा वेगळी आहे !

रात्री पुरते जमणारे
झाडावर विसावा घेणारे
ब्लॉक-ओनर (फ्लॅट मालक) आहोत
तरीही गर्वाचा व माझं म्हणण्याचा
मुकुट आपल्या कपाळी आहे
तोवर साऱ्याचे मालक आपण शून्य आहोत !

कुणाचं काय आहे !
मानलं तर ते कळण्यासारखं आहे
नाहीतर ते माझंच आहे !

विशुध्द मनच आपल्याकडे नसेल तर
स्वार्थाचा कलंक आपल्या मनाला पोखरतच राहणार
मग सारं माझं आहे... एकट्याचं !

≈

## कॉम्प्युटर / डॉ. सुनील सावंत

आपल्याच घरट्यात पक्षिणीला शोधणारा पक्षी
आणि समोरच्या पिंपळावर
गुर्टरगुं करणारी कबुतरे !

पहाटे घरटं आवरणारी पक्षिण
पटापट आवरुन पिल्लांना दूध प्यायला सांगून
भुर्रकन उडून जाते सात पाचची लोकल पकडायला
मग पक्षांच्या थव्यात हरवून – जाते
हरखून जातो निःशब्द पक्षी !
संध्याकाळी पिल्लांचा कल्लोळ
घरटं सगळं विस्कटलेलं !
कॉम्प्युटरवर गेम खेळणारी पिल्ले
अभ्यासाची फ्लॉपी शेजारी ठेवतात !

गगनचुंबी इमारतीत महिन्याचा तनखा घेऊन
पुन्हा पुन्हा काड्या व्यवस्थित ठेवतात नोकर माणसं.
तुमच्या आमच्या घरात
पिल्लांचे आजी आजोबा नसतील
काका मामा नसतील
तर रात्रीचे बारा कधीच वाजतात
तरीही घरट्याच्या काड्या विस्कटलेल्याच !

मायेचा ओलावा पहाटेचे दवबिंदू घेऊन जातात
तेंव्हा पुन्हा सात पाचची लोकल वाट पाहत असते
संध्याकाळी चार पाचची लोकल कधी कधी चुकते
आणि पक्षिण नाजूक वास्तवाला
धापा टाकीत घरी घेऊन येते !

आणि पुन्हा सगळ्या घरावरुन हात फिरवते
– मायेचा !
घरटं रोज विस्कटते आणि रोज लावते
तरीही ते रोज विस्कटतच जाते

पक्षी आता घरटं बनवण्यासाठी
घरट्यात दिवसभर थांबतो
पण वास्तव बदलणारा कॉम्प्युटर
कधी निर्माण होईल
हे कळत नाही पक्षाला
पक्षी खिन्न, उदास !

≈

## ज्ञानसूर्य / डॉ. सुनील सावंत

ज्ञानाची गंगोत्री ओतावी
गरजवंत, प्रामाणिक व श्रीमंत
विश्वासमोर : अगदी सहज !
मात्र ढोंगी मुखवटेधारकांसमोर
करु नये रिक्त ओंजळ ज्ञानाची
नकळत त्यांच्या भोळेपणाला भुलून.

विश्वाला मोफत ज्ञान वाटण्यापूर्वी
पडताळावी विश्व–प्रवृत्ति

हल्ली मोजावे लागतात ज्ञानासाठी
गांधीजींचे हिरवे चेहरे : अमाप !
तेंव्हापासून
अशोकस्तंभधारी नाणी लोखंडाच्या भावाने
विकली जातायत शिक्षणाच्या बाजारात !

विद्यार्थ्यांनों, गुरुजनांनो सावधान,
पैशाची लूट करुन
ज्ञान वाटणारे सुपीक मेंदू फोफावलेत
रस्तोरस्ती !
मुक्या गोंडस बालकांचा घेतायत बळी !
म्हणूनच सरकारी लष्कराने
वाजवलाय सावधानतेचा भोंगा !
असा भोंगा क्वचितच वाजतो
घन निळ्या ढगांच्या क्षितिजावर
समुद्रात बुडून जाण्यापूर्वीचा इशारा
सावधानतेचे शस्त्र मनात असू दे जिवंत

अवास्तव पैसा कमवण्यासाठी
ज्ञानगंगा विकणाऱ्यांना लगाम घालू दे
सतर्क ज्ञानमहर्षींनी
बाजार मांडणाऱ्यांना लगाम घालू दे
ठेच लागू दे
समस्त जनतेच्या जागृतीने
तेजोमय ज्ञानसूर्याने
विश्व प्रकाशावे.

≈

## गृहपुरुष / डॉ. सुनील सावंत

‘‘गरजा भागवणे या मुंबईत
तारेवरची कसरत आहे
म्हणून नोकरी करणारी स्त्री
मी समजू शकतो’’

‘‘पण जिथे फक्त पती-पत्नी
व मुलांचे छोटं घर आहे
तिथे सकाळी उठून स्वत्वासाठी
धडपडणारी स्त्री....
समजू शकेल का ?’’

‘‘घरात सुबत्ता असतानाही नोकरी
करणारी स्त्री....
समजू शकेल का ?’’

‘‘संपूर्ण घराची पूर्ण जबाबदारी
तिच्या खांद्यावर देऊन
पतीने घर सांभाळावे
पतीने गृहपुरुष बनावे !’’

‘‘घरातील काम आयुष्यभर
न संपणारे मंगल कार्य आहे
फक्त इतकंच
त्याची किंमत पगारात करता येत नाही
पगार दिला जातो तो मोलकरणीला किंवा घरगड्याला !
पतीला किंवा पत्नीला नाही !’’

‘‘ते घर नावाच्या वर्तुळाचे
केंद्रबिंदू असतात ! मालकच असतात !!
फक्त समजुतीचा घोटाळा असतो
आणि म्हणूनच गोतावळा बनतो
- न सुटणाऱ्या गुंडाळ्याचा !’’

## गाठोडे / डॉ. सुनील सावंत

एक भिकारी स्वप्न रंगवितो महाल बांधण्याचे
काखोटीला त्याच्या गाठोडे संपूर्ण आयुष्याचे !

सत्ता व जनतेतील अंतर करी संबंध दुराव्याचे
जगणे मग सामान्यांचे होते पाखंडी बनण्याचे !

पहाटेचे धुंद हवेचे स्वप्न, कष्टातच गुरफटण्याचे
डोईवर मुकुट ठेवणे कार्य इथल्या शिलेदारांचे !

ऋतू असे इथले कधीतरी भिंती रंगविण्याचे
गुण मात्र त्यांचे जिंकूनी सहज विसरण्याचे !

भांडण नाही मंत्रालयातील अनेक खुर्च्यांचे
त्यावरील 'संधीसाधूंचे' ध्यान फक्त खाण्याचे !

≈

## चिमणा, चिमणी आणि पिल्लांचे स्वातंत्र्य / डॉ. सुनील सावंत

चिमणी आता वेबसाइटवर बसते
आपल्याच घरट्यात
चिमण्यासह काही क्षण घालवावेत
असेही तिच्या मनात येते
पण वाट पाहावी लागते
घरटं शांत होण्याची !
इतक्यात फोनचीही बेल वाजते
चिमणी तरतरीत होऊन फोनवर बोलते
चिमणा बेभान होऊन घोरु लागतो !

सकाळी पक्षांच्या थव्यात
चिमणी अदृश्य होते...
...मनाला समजावणं कठीण जातं !

घरासारखं – बाथरुमसारखं मनाला सुध्दा
आता दार लावून घेतलंय–
प्रत्येकाने !

योग्य बटण दाबून माऊसने योग्य दिशा
दाखवली तरच हवं ते संगणकावर मिळतं
अगदी तसंच !
तसंच झालंय मानवी जीवन.

निष्कारण चुकीची गणिते सोडवतोय
मनाचे दार अधिकच घट्ट करतोय
जीवनाच्या ओसरीवर रात्रीच्या चांदण्या
बहरणार नाहीत... ह्याची चोखपणे सोय करतोय

काही क्षणांचा एकांत
भांडणात जातोय !
विस्कटलेल्या मनाचं पुनर्वसन करण्यात
वाया घालवतोय अनेक रात्री !

आणि मग काही क्षण खोटंही रडतोय
निस्तेज शरीरावर हार घालताना
... सगळ्या नातेवाईकांना बोलावतोय

तुमचे आमचे घर
मनाच्या बांधिलकीतून सुटून रानोमाळ भटकतेय !

घरः तुमचे आमचे
भिंतीवर आधारलेय एवढीच घराची व्याख्या
तंत्रज्ञानाच्या विळख्यात भावना विसरलेय ?
– आदर – मान– सन्मान दुर्मिळ होतोय
म्हणून – चिमणा, चिमणी आणि पिल्ले
आता खरी 'स्वतंत्र' झालीत !

≈

## सुस्तावलेला ऋतू / डॉ. सुनील सावंत

मी बाद झालो तुम्ही नाबाद राहिलात
माझा शिशिर अवेळीचा, तुमचा तो वसंत जाहला !

आयुष्याच्या काळाच्या आगीत मी पेटत राहिलो
तुमचा सांत्वनाचा सहारा क्षणभर त्या लोटावर धडकला !

सुगंध माझ्या जीवनातील तुम्हाला वाटीत गेलो
मग माझ्या सुगंधी सूर्याला तुम्हीच चोरावयास गेलात !

माझे रक्त संपले, तेव्हां तुम्हाला जोष आला
तरी बरे झाले, माझ्याच रक्तदानावर तुम्ही जगलेलात !

माझ्याच मृगातल्या धारांनी तुम्ही ऐश्वर्य फुलवले
माझे मेघ आटले, तेव्हा तुमचा वर्षाऋतू बहरला !

माझ्या अस्तित्वात इशारा नकळत विझून गेला
तुमच्या हातात मृत्यूपूर्वीच माझा अस्थिकलश झळकला !

विसरलात तुम्ही बहाराच्या त्या भाबड्या कथा
माझ्या निर्वाणाने सावराल का तुमचा ऋतू सुस्तावलेला !

≈

## मी ऊन शोधत होतो / डॉ. सुनील सावंत

मी ऊन शोधत फिरत होतो –

पहाटेच्या मऊशार धुक्यात
पिवळे धम्मक ऊन शोधत –
मी कुठवर येऊन पोहोचलोय !

समोर एक डोंगर असायला
हवा होता –
चढण चढून उतरलो असतो
आमच्या घरात गेलो असतो
तिच्या स्पर्शात ऊन शोधले असते
ऊन... ऊन... ऊन !
उन्हात न्हाऊन तृप्त झालो असतो

परंतु इथे वर समोर
डांबरी रस्ते अन्
सिमेंट क्राँकीटच्या उंचच उंच
इमारती दिसतायत
त्यांच्या सावल्यांनी
ही मुंबई सकाळी सकाळीच
झाकोळून गेलीय
कुठेतरी झरोख्यासारखे
ऊन बाहेर आलेय
तेही क्षणभर विसावा देतेय

पुन्हा तेच...
मी ऊन शोधत फिरतोय !
ती गावाकडे राहतेय !

≈

## 'तू–पण' मालवावे, रान पेटवावे / डॉ. सुनील सावंत

गडद हिरवाईचे गूढ नेसून तू यावे
अन् दवबिंदूचे स्पंदन शरीरात पसरावे

सायंकाळी धीर गंभीर मेघ तू बनावे
अन् इंद्रधनुचे रंग मनावर शिंपडावे

संथ दूरस्थ तनामधून तू पाझरावे
अन् धबधब्याच्या तुषारांनी मजला लपेटावे !

काजव्याच्या मंद स्मितातून तू दिसावे
अन् साऱ्या रात्रीने रातराणी प्यावे !

तू जरी निष्पर्ण, तरीही वसंत लहरी व्हावे
अन् सूर्यप्रकाशातही चांदणे अंगावर झेलावे !

मी मृगातील पाऊस होऊन थांबावे
अन् वाळूचे घर तुझ्यातच लोपून जावे !

साऱ्या खुणा बुझाव्यात असे तू वादळावे
अन् तुझ्यातील 'तू–पण' मालवावे, रान पेटवावे !

≈

## सुख / डॉ. सुनील सावंत

सुखाची कल्पना कोणती
कशाला त्याची मनी भीती !

जगतात इथे सर्वसामान्यांची मडकी
पोटे भरतात त्यांची पोरे कडकी
उच्चस्तरीयांची येथे मोटारीतून भ्रमंती
सुख असे या वर्गाला अजस्त्र, या जगती !

या खालील वर्गीय, ना उच्चस्तरीय वर्ग
असा माणूस शोधितो अंधारात स्वर्ग
ना रस्त्यावर पसरु शकत तो झोळी
ना तो करु शकत या जगण्याची कागाळी !

खालीलवर्गीयांना काळजी असते उद्याच्या भाकरीची
उच्चस्तरीयांना गाडीत पेट्रोल भरण्याची !
अन् या मधील वर्गाला सूर्याकडे झेपावण्याची !
उच्चस्तरीय बनण्याची, मंगळावर प्रवास करण्याची !

≈

## इंडिया सुध्दा महानच देश आहे ! / डॉ. सुनील सावंत

प्रत्येक भारतीय नागरीक
भारतीय स्वातंत्र्याचा आधारस्तंभ आहे
भारताच्या संस्कृतीचे – नितिमत्तेचे रक्षण
प्रत्येकाच्या मनात रुजवलेले आहे

प्रत्येक भारतीय नागरिक
भारतीय संरक्षणदलाचा शिपाई आहे !
जरी तो नसला नोकरीत लष्कराच्या,
नौदलाच्या किंवा हवाईदलाच्या !
प्रत्येकाची ती जबाबदारी आहे
अप्रत्यक्षपणे :
देशाचे हित जपणे
प्रथम कर्तव्य आहे !
देशापुढे सगळे विश्व ठेंगणे आहे
पहिल्यांदा भारत देश महान आहे !

फक्त संपूर्ण विश्वात
भारत किंवा इंडिया
ह्यातील एकच नाव प्रचलित करणे
आपल्या सगळ्यांवर बंधनकारक आहे !

संपूर्ण विश्वात एका देशाची
अशी दोन नावे अस्तित्वात नाहीत !
– ह्याचे भान स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षानंतर
आमच्या राज्यकर्त्यांना येईल का ?
ह्याची जाणीव पोखरुन टाकते
...भारताला ....मनाला...

भारत महान देश आहे
इंडिया सुध्दा महानच देश आहे !

## पिंपळवृक्ष / डॉ. सुनील सावंत

समोरचा पिंपळवृक्ष
नक्कीच स्वातंत्र्यापूर्वीचा असावा
इतका तो सरळसोट उभा आहे संपूर्ण फांद्या जगभर पसरवून !
स्वातंत्र्यानंतर उगवलेले पिंपळवृक्षाचे रोप
इमारतीच्या सांडपाण्याच्या पाईपावर दिसते !
नाहीतर ओसाड रानमाळावर दगडांवर दिसते !
इमारतीला भविष्यात धोका पोहचू नये म्हणून –
अस्तित्वात असली तर वास्तवातील व्यवस्थापकीय समिती
पिंपळवृक्षाचे ते रोप काढून टाकण्याचे
– लोक हिताचे कार्य करतात !
तेंव्हा काही कर्मठ मंडळी–
त्या रोपाचा देववृक्ष म्हणून उदोउदो करतात
आणि रोपे काढायला विरोधही करतात–
पिंपळ मोठा होऊन इमारत पडली तरी चालेल
इतका त्यांचा विरोध कडवा !
म्हणूनच अभिनिवेशाने उभे पिंपळवृक्षाचे रोपटे
काढताना वेदना होतात !
मानवी जीवनापेक्षा मूल्यवान ते इमारतीवरील रोपटे !

आणि समोरचा पिंपळवृक्षः
स्वातंत्र्यापूर्वीपासून वाढत आलेला !
भर रस्त्यात गाड्यांची रहदारी अडवतोय !
कायदे निष्क्रीय झालेत – त्याच्यासमोर !
त्याच्यासमोर महान संसद हतबल झालीय !
भर रस्त्यात तो ठाण मांडून बसलाय –
सगळ्या नियमांना कवेत घेऊन निःसंकोचपणे !
ध्यानस्थ वटवृक्षासारखा !

≈

## तू जेव्हां मनात येतेस.... / डॉ. सुनील सावंत

तू जेंव्हा मनात येतेस सारं जग अनोळखी होते
तुला जपायचं ठरवलं की जगाची रीत आड येते !

जोशात खेळ खेळताना माझे क्षण हरवले होते
तुझ्या रेशमी करस्पर्शाचे भाग्य माझ्याच भाळी नव्हते !

तुझं ते सोज्वळ बसणं अन् उठणं नयनात सामावत नव्हते
लोभस तुझे वागणे-चालणे रोमारोमात बहरत होते !

समुद्राच्या लाटांवर तुझे नाजुक रुप हासत होते
आभाळाच्या निळ्या ढगांवर गाणे तुझे पसरत होते !

तुझे साधे रुप कितीतरी वेगळे भासत होते
रोजची तू न् आजची तू ह्यात गाणे तुझे पसरत होते !

भाव मनातील सांगावेत कसे ? असे सारे पश्न होते
तुझे सारे वागणे खोल मनात रुतले होते !

संध्याकाळी अलविदा होण्याचे क्षण जवळ आले होते
कुणास ठाऊक कसे, ‘तुझे’ घर माझ्या मनात रचले होते !

≈

## उषा / डॉ. सुनील सावंत

निरभ्र आभाळातून डोकावणारा चंद्र
अजूनही सोबतीला होता
अन् क्षितिजाच्या एका कडेवरुन
उषेची अंधुक पिवळी किरणे
या विश्वावर पसरत होती

शेतातील तृणांवर उषा खेळत होती
ह्या विश्वावर उषा पसरत होती
– फुलत होती,
जगाचं रहाटगाडगं पुढे ढकलत होती

आभाळातील चंद्रमा उषेत विलीन झाला होता
उषा या विश्वावर विराजमान झाली होती !
जगाच्या दिनमानाची ती सम्राज्ञी होती –
तिला कुठे माहित होतं की
ती प्रत्येकाच्या मनाची राणी होती –
– जीवन फुलविणारी !

≈

## गंध / डॉ. सुनील सावंत

सोनटक्क्याचा गंध
अगदी जवळून सरकला
म्हणून मी वळून पाहिले
तर... ती तूच होतीस
तो सुंगध माझ्याशी हसला
तू पिवळेपण पेरुन गेलीस
वाटा – रस्ते कोरडे झाले !
पाऊसही गेला
सोनटक्क्याचा बहरण्याचा मोसमही संपला !

हल्ली मी वाट बघत असतो
दरवर्षी येणाऱ्या पावसाची !

≈

## आलेख / डॉ. सुनील सावंत

मागील अडतीस वर्षांचा आलेख :
अक्षांशावरुन आलेली रेषा
रेखांशावरील रेषेला जुळली
आणि कलम केल्यासारखी तिसरी रेषा उगवली
पुन्हा केंव्हातरी रेषा अक्षांशावरुन आणि
रेखांशावरील कलम केलेल्या रेषेतून सुटल्या
आणि नंतर त्यातून 'बोनसॉय' झालेली रेषा उमटली

पुन्हा केंव्हातरी रेषा विलग झाल्या
आणि आलेख कागदावर अनंत रेषा
एकमेकांत गुंतून गेल्या !
फक्त जागेवर राहिले ते अक्षांश व रेखांश –
नवीन रेषांच्या प्रतिक्षेत !

आलेख कागदावरीवल अनंत चौकोनातून
फुले फुलत राहिली तेंव्हा –
मूळ रेषांच्या मीलनाची रात्रच विराण झाली !
आणि आलेख कागदावर चित्रविचित्र
रंग पसरलेले चित्रच कोरले गेले –
त्याला 'मॉडर्न आर्ट' म्हणून गौरविले

पण जीवनाचा आलेख मात्र
त्यावर रेखाटता आला नाही !
भावनेची मात्रा मोजता आला नाही !
ती त्या कागदावर कुठे लावली ते कळलं नाही !

≈

## आधार / डॉ. सुनील सावंत

मी माझ्या वेदनेच्या घरातून
आतासा कुठे पूर्णपणे बाहेर आलो आहे
तोपर्यंत पुन्हा तेच मृगजळ दिसू लागले
.... आधाराचे !

आधार असतो तरी काय ?
वेदनेच्या घरात ठेवलेला एक आरसा !
आपण पावडर लावताना पाहायचा आरसा !!
कंटाळून घामेजलेला चेहरा पाहायचा आरसा !!!
पण मग फुटल्यावर...
अस्ताव्यस्त पडलेल्या 'पारा' लावलेल्या काचा
'इंधन' नसलेल्या यंत्रासारखा !
... नंतर पुन्हा नवीन आरसा आणायचा
... तोच, आधाराचा !
आणावा लागतो मनाच्या समाधानासाठी
मग पुन्हा गुरफटू लागतो...
त्या मृगजळात आधाराच्या !
पण पूर्वीचे नाते... त्या आधारातच संपलेले असते !
म्हणून
कृपया,
दाखवू नका ते मृगजळ !
आपल्या नसलेल्या आधाराचे !

≈

## कॉलेज 'डे' / डॉ. सुनील सावंत

कॉलेड 'डे'
एक उत्साही वातावरण
'ॲकॅडॅमिक इअर' मधील विद्यार्थ्यांचा शेवटचा दिवस
'टि.वाय' च्या मुलांचा कॉलेज लाईफमधील शेवटचा दिवस
कुठे ? कोण ? कधी भेटेल, हे अनिश्चित !

ह्या दिवशी
अथांग मनाच्या महासागरात धावत असते – उत्साही मन
अशा वेळी
तिने त्याला शोधावे – त्याने तिला शोधावे
कार्यक्रम संपल्यानंतरही गेटजवळ वाट पाहावी
त्याच्याशी तासन्तास बोलावे
झगमगत्या प्रकाशात त्याच्या मनात सूर्य उगवावा
पहाटेच्या पाखरांचे गोड गुंजन ऐकायला यावे
पुन्हा उद्या भेटायचे आश्वासन द्यावे
तिने हास्य – बहार उधळावी
आणि ती रात्र एकांतपणाच्या कुशीत
'कॉलेज डे' च्या आठवणीत हरवावी

उद्या तोच सूर्य : स्तब्धतेचे उल्हास
त्या शब्दांचे अन् उत्साहाचे मोल
कालच संपायचे होते का ?
अनंताच्या यात्रेसाठीच
ही सोबत होती का ?

फाळणी नंतरचा अगम्य शोध
कॉलेज डे च्या आठवणीत विसावतो :
कुठे रानात कोकिळा गात असते !
वसंताच्या आगमनाची चाहूल होते !

≈

## गगनझेपीचे क्षण.... / डॉ. सुनील सावंत

एका अनोख्या क्षणी
दाटून येतं मनात
मेघांतील ढगांसारखं
आणि भरुन येतात आसवं डोळ्यांत

निरोप समारंभाचे नकळत येतात क्षण
आणि दिसतात दूरवर उडणारी पाखरं
त्यातील एक पाखरु,
जडावलेले पंख घेऊन, गळून जाणारी पिसे सावरत
– त्या प्रयत्न करतं–उडण्याचा
त्या दूरवर गगनझेप घेणाऱ्या
पाखरांना गाठण्यासाठी !

मात्र लाभलेली संधी दवडायची नाही
ती क्वचितच लाभते अन्
क्वचितच योग्य असते – आपल्यासाठी !
असे क्षण येतात आणि पुन्हा भरुन येतात
आसवं डोळ्यात !

एस. टी. स्टँडवर निरोप देताना
जी कालवाकालव होते
– गाडी सुटेपर्यंत !
अगदी तसेच असतात गगनझेपीचे क्षण !

≈

## अपरिचित सहस्त्रकाचे स्वागत / डॉ. सुनील सावंत

युगानयुगे जशी गेली
तसेच कालचे वर्ष एका रात्रीत
मावळून गेले–नूतन वर्षाभिनंदनात !

मावळतीचे करार
अतिरेक्यांचे वार
यात सारी वर्षे संपली

जाग आली तेव्हांही
आयोगांची सुनावणी अपूर्ण होती
म्हणूनच शोध घेण्यासाठी
नवीन आयोगाची नेमणूक झाली !

तुम्ही – आम्ही साथी दोन दिवसांचे
तरीही वैमनस्य–वैर घेऊन जगणारे
मायेचे धागे व्यवहारी जगात
गुंतताच आले नाहीत आम्हाला

मानवतेच्या पायावर माणूसकी रचून
सर्व भेद नष्ट करुन स्नेह वाढवू या !
माणूस शेवटी एकच आहे लक्षात ठेवू या
येणाऱ्या वर्षी माणूस जगवू या
माणसासाठी मानवतेची पेरणी करु या,
माणूस धर्म महान करु या !

येणाऱ्या अपरिचित सहस्त्रकाचे स्वागत करु याः
केवळ माणूस धर्माने

≈

## पदगंध / डॉ. सुनील सावंत

पूर्वीची पायवाट
मोडू नये आपण
तिथे जपलेल्या खुणा
बुझवू नयेत आपण
कधी काळी त्यावरुन
अनेक वाटसरु गेलेले असतात
त्यांचे लागेबांधे तिथे जोडलेले असतात
– जरी ती वाट ओसाड असली आता !
कधी तरी भटकत पुन्हा
ते येथील – आपल्या जुन्या स्मृती शोधत,
आठवणींची रोपे मागत !
मग... ? काय मिळेल त्यांना
त्यांच्यासारखीच विस्कटलेली पायवाट !
की
युगानुयुगे प्रेम अन् वात्सल्याची वाट पाहणारी
वाऱ्याबरोबर उडणारी धूळ !

काळानुसार परिवर्तन होतच राहील
पण स्मृतींचे जतन करावे आपण
इतिहासाच्या पदगंधासाठी !

≈

## आयुष्य / डॉ. सुनील सावंत

आयुष्याच्या बेदर्दी वाटेवर
अशी अवचित आठवण भेटली
अन् जुन्या आयुष्याच्या
मशाली उजळल्या !

खरं तर प्रत्येक वाटेवर गतकालीन
शिळा रुतून पडलीय
तरीही आज – बेदर्दी वाटेवर
हे जीवन हरखून गेले –

वाटा मोडीत जात आहे पुढे ते
पण वाटेचा अंतच कळला नाहीय

कदाचित पुढे जन्माची भेट असेल !
बेदर्दी जीवनाचा अर्थ तो सांगेल
म्हणून – म्हणूनच हा बेदर्दी प्रवास मी करतोय –

कदाचित पुन्हा आठवण भेटेल –
जळणाऱ्या काड्यांच्या धुरातून ती पुन्हा एकदा
....जगभर पसरेल !

≈

## **चिरडलेले** / डॉ. सुनील सावंत

आयुष्य आहे हे जगणे असलेले
दुखण्याचे ओझे सदा पाठीशी बांधलेले !

संसाराची शृंखला गळ्यात अडकविलेले
मुलांचे रडणे जीवन माळावर पसरलेले !

मृत्यूच्या भीतीने दवाखान्यात पोचलेले
दवाखान्यांनी असे हे जीवन ओरबडलेले !

प्रेम इथले वाळवंटातील मृगजळ झालेले
आणि इथे जिवंतपणी मानवप्राणी चिरडलेले !

≈

## गावाच्या वेशीवरून ..... / डॉ. सुनील सावंत

''परदेशी जाके परदेसियाँ...''
दूर कुठेतरी गावाच्या वेशीवरून
गाण्याचे सूर कानी येत होते
आणि आमच्या घरासमोर
घामाने डबडबलेली दोन शरीरं
दहा रुपयासाठी लाकडं फोडीत होती

तांबड्या वाटेवरुन
उघडी-बोडकी शरीरं घेऊन
लहान मुलं व्हाळावर न्हाण्यासाठी
टॉल घेऊन धावत होती
बाप त्या पोरांवर केकाटत होता
''पोरांनो, काजीत जावा''
पोरं बापाला चुकवून
व्हाळावर जात होती
व्हाळावर थंड-गरम पाण्यात
-पोर डुबकत होती!

सांज झाली...
गाण्याचे स्वर दूर मंद झाले होते
''मै पिता हूँ गम भूलाने के लिए...''

दोन शरीरं दहा रुपये घेऊन
अण्णाकडे काजूची प्यायला ...
... निघाली होती !
गावाच्या चव्हाट्याला नमस्कार करुन !

≈

## तू : नियती / डॉ. सुनील सावंत

आज माझ्या स्वप्नांचा खेळ तू मांडू नको
आताच्या माझ्या घरात चुकूनही डोकावू नको !

गर्दीत माणसांच्या अस्मिता तू जागवू नको
दांभिक महानतेची सुखी कल्पना दाखवू नको !

तुझ्या अस्तित्वाने माझे जीवन तू घडवू नको
क्षणाक्षणाला मजला असत्याचा बळी बनवू नको !

असं अचानक शीतल चांदण्याला तू विझवू नको
आनंदाचे थेंब वर्षावताना फुले होणे नाकारु नको !

आज माझ्या आयुष्यात एकरुप तू होऊ नको
या जीवनातील 'जगणे' तुझे तू लाथाडू नको !

≈

## माणूस : असमर्थ ! / डॉ. सुनील सावंत

रडणाऱ्या नशिबाचा साथी म्हणून
ढासळलेल्या सत्यात वावरतोय
वेळेच्या बंधनातील कैदी माणूस –
त्याच्या सुख–स्वप्नांना वेशीवर टांगतोय

नासावलेल्या स्त्री सारखा माणूस
गर्भगळित मुलाला शोधतोय !
तिचं बाळंतपण झालेलं नाहीय
तरीही 'खेळणे' शोधण्यात माणूस हरवतोय !

जन्माचे सार्थक शोधून नाही सापडले
शोधण्यात निम्मे आयुष्य संपवतोय
मानवी जन्म सार्थकी ठरविण्यासाठी
'मिळाले' त्यातच ऐश्वर्य मानायचे ठरवतोय !

≈

## निसर्गापलीकडचे नाते / डॉ. सुनील सावंत

तुला निसर्गाच्या कक्षेतून सोडता येत नाही
पण तुला तुझा विश्वास हवा
मला माझा विश्वास हवा
मग विणते जाते एक रेशमी नाते
निसर्गापलिकडचे !
तुझे नी माझे !
निखळ मैत्रीचे !

≈

## अन्वय / डॉ. सुनील सावंत

कधीपासून तुझ्या मनाचा
अन्वय लावत, मी एकटा हिंडतोय
मला आठवतं, कधीतरी तू खूप बोलतेस
जसं काही फुलाने भ्रमरास सर्वस्व द्यावे !
कधीतरी तू खूप दूरावतेस
जसं काही सुगंधाने फुलाचे अस्तित्व नाकारावे

मला कळतं नाही
मीच का गुंतत राहावे !
मला सुटता येणार नाही का...
तुझ्या चिंतनातून...

तुझ्या चिंतनातून बाहेरच पडता येत नाही
तुझ्या शब्दासाठी मी सर्व सोडून
तुझ्या मनाचा अन्वय लावत
मी कोंडून घेतलंय माझ्या मनाला
तुझ्या अस्तित्वाच्या चक्रव्यूहात !

तुझ्या प्रीतीसाठी तडफडतोय मी
मी संपूनही जाईन तुझ्यात
तोपर्यंत कदाचित मला तुझ्या मनाचा
अन्वय लागणार नाही
पण एकदाच मला अन्वय लागू दे :
तुझ्या मनाचा
एका कोमल हृदयाच्या क्षुल्लक मानवाला !

≈

## एक माहेर पुरुषांसाठी / डॉ. सुनील सावंत

एक माहेर पुरुषांसाठी असावं – मायेचं
माघारपण करण्यासाठी बायकांसारखं
एक मन पुरुषांनाही समजून घेणारं असावं !

पुरुषांनाही एक अव्यक्त मन असतं
त्यांच्याही मनात दाटलेली असतात आसवं
त्यांनाही कुणी हवं असतं – त्यांचं ऐकणारं
त्यांचं मन हलकं करणारं – अश्रू पुसणारं!

त्यांचे अश्रू पुसणारी एक आई असते
मोठं होईपर्यंत सावली असते – पावलोपावली
आणि मग मोठे झाल्यानंतर – कुणीच नसतं
पुरुषांच्या मनाचे पापुद्रे अलगद उलगडणारं !

निश्चिंतपणे रडण्यासाठी, मनःशांती लाभण्यासाठी
पुरुषांच्या मनावरील कोळीष्टकं झटकणारं
हक्काचा खांदा पुढे करणारं माणूस हवं असतं
थकलेल्या मनाला उत्साह देणारं माहेर हवं असतं !

≈

## पुन्हा उजाडण्यासाठी / डॉ. सुनील सावंत

तू भेटलीस
अन् मरण पावलेली भावना जागविलीस

आजवर
आजुबाजूला वावरणाऱ्या माणसांनी
माझी भावनाच संपवून टाकलेली
माझं हृदय कातळासारखं कठीण केलेलं–
जे जन्मापासून मृदू होतं !

प्रत्येक गोष्ट व्यवहारातच जपलेली
अन् वास्तवानेच घेरलेली.

अचानक तू भेटलीस
अन् माझी मृतावस्थेतील सुप्त भावना
अकस्मात जागी झाली

हेही नसे थोडके – पुन्हा उजाडण्यासाठी !

≈

## अर्थ सांगून गेलीस / डॉ. सुनील सावंत

आसवांना साथी मिळावा
तशी तू भेटलीस
शब्दांना किंमत देणारी
जशी जोडीदार भेटली

जीवनाचा अर्थ शोधत
इतकी वर्षे उडून गेली
आपल्याला समजणारा
'माणूस' काही भेटला नाही !

'माणसाच्या' जीवनाचा अर्थ काय ?
भावना, प्रेम की शारीरिक सुख ?

जगात वावरताना
दुःख वाटले ते एकच की
सगळं जग स्त्रीकडे
एकाच दृष्टीने बघतं !
जग सारं माया का शोधत नाही स्त्रियांमध्ये ?
माझ्यापुढे हाच प्रश्न आहे !

मी ह्याच प्रश्नात गुंतलोय
अन् तू अचानक भेटलीस
आणि शब्दांना किंमत देऊन
जीवनाचा अर्थ
सांगून गेलीस !

तुला खूप जपतोय जगापासून
कसं सांगायचं तुला ?
की जग तुझ्या शब्दांतूनही वेगळा
अर्थ काढतं-
तू शब्द जपून वापर
निदान माझ्यासमोर कुणी
काही तुझ्याबद्दल बोललं
तर मी त्या संपूर्ण जगाशी भांडतो !

तेंव्हा कधी कधी
पुरुषांसह स्त्रियांही
मला वेड्यात काढतात !
स्त्रीची सुलभ भावना जपण्यासाठी
मला कष्ट पडतात.
मग वाटे-वाटेवर लपून बसलेला
जगाचा विविध दृष्टीकोन डोकं वर काढतो

तुला शब्दांच्या भावनेत गुंफताना
माझी मायेची भावना
तोकडी पडते-
वास्तवाच्या ज्वलंत परिस्थितीत
तू ही हरतेस, मी ही हरतो
भावनांपेक्षा वास्तवच भयाण असते
संपूर्ण विश्व तिथेच येऊन थांबते !

≈

## काळाच्या ओघात / डॉ. सुनील सावंत

काळाच्या ओघात
मागे राहिलेल्या आठवणी
सांजवेळी परतून लागलेली गाणी
तुझी नी माझी !

समुद्राच्या लाटांवर
रेंगाळणारी मावळणारी किरणे
प्रातःकाळी दारात दुधवाल्याचे हसणे
घरासाठी नी बाळासाठी !

मनाच्या आभाळावर
भावनांचे ढग दाटून आलेले
आसवं होऊन कधीतरी बरसलेले
अंतकरणात – मनातल्या मनात !

जीवनाच्या वळणावर
मागे झालेल्या आपल्या चुका
हुलकावण्या देणारा काळोख
डोळ्यात नी मनात !

≈

## ऋतू अवेळी फुलला / डॉ. सुनील सावंत

ऋतू अवेळी फुलला
अन् ग्रीष्मात मोगरा बहरला !

रानावनातून निशिगंध सुवासला
पानापानांतून मंद तरंग सुखावला !

नकळत रात्रही अंगावर घेऊन आला
पश्चिमेचा वारा गात्रातून वाहून गेला !

भावनांचा ओघ क्षणभर खळाळून गेला
कदाचित उद्याचे संबंध उमलवून गेला !

अनोखे नाते अजाणता जाणवून गेला
ऋतू अवेळी रिमझिम बरसून गेला !!

≈

## युगांची ओझी / डॉ. सुनील सावंत

माळरानावरील शेतात
एक अनोखी फुलवात
मनात तेवत गेली
हातात हात गुंफीत गेली !

चरणारी गुरे जंगलात
करवंदीच्या जाळीत
ओठावर लाली आली
मुक्त कंठी कोकिळा गायली !

गुरे परतली गोठ्यात
चुलीवर भात सुगडात
लाकडांची आग भडकली
सुग्रणीने रातराणी माळली !

मंद गंधकी प्रकाशात
रातराणीच्या धुंद सुवासात
रात्रीची झुंजूमुंजू झाली
युगांची ओझी हलकी झाली !

≈

## **भावना** / डॉ. सुनील सावंत

रुळावरुन गडगडाट करत जाणारी रेल्वेगाडी
तशी भावना–
एका क्षणात मनाचा चक्काचूर करुन टाकणारी !
एका क्षणात मनाला फुलविणारी अन् रडविणारी !!

आजही नकळत
श्रावणातील पाऊस उघड–झाप करत निघून जातो !
ऊन–पाऊस खेळ संपत नाही !
ऋतूचक्र थांबत नाही
ते अव्याहत चालू आहे
चालू राहील जगाच्या अंतापर्यंत !
पण भावनेचे काय ?
ती कायम व्याकूळ !
आपला साथी शोधत
अवास्तवपणे मानवी जगात भटकतेय !

गुलाबाच्या पाकळ्यांवरुन
चालताना सगळेच ढसाढसा रडतात का ?
रडतात त्या पाकळ्या–
कुस्करुन अंथरलेल्या
इतरांच्या आनंदासाठी !
इतरांच्या सुखासाठी !
याचं भान कुठे असतं ?

तशी ती भावना.... !

≈

## अनंताचा सुवास / डॉ. सुनील सावंत

गुंत्यात अडकून पडलेला
आज नकळत आडवाटेने
मनाच्या प्रवेशद्वारात
भारद्वाज हा आलेला !

सारं काही वादळ
या मनातून ओसरलेलं
आणि भारद्वाज मुक्तपणे
उडत गेलेला !

कित्येक दिवसांची रात्र
कैफाने भरलेली
मोकळी-मोकळी
पिंजऱ्यातून सुटलेल्या पक्षासारखी
स्वच्छंद हसवून गेली

कित्येक स्वप्ने अवचित
या नयनावर शब्दांनी फुलली !

अन् पुन्हा एकदा-
पाणंदीमधून काट्याच्या वाटे आडून
रानफूल या मनात हसले....
....हसता हसता सारे बोचलेले काटे
त्या सुगंधाने या ओठावर विरघळून गेले
तो सुगंध जपायचा, मी ठरवलंय !

सुरंगाच्या गंधासारखा
तुझ्या केसातील....
....अनंताच्या सुवासासारखा

≈

## सुरयाचा प्रतिबिंब / डॉ. सुनील सावंत

''समोरच्या जास्वंदीक बघताना,
न्हावक दुका व्हाया''
म्हणान आजी घरात गेली
जास्वंदीक बघताना....
वगत कसो जाता,
ह्या समजाक सुदा नाय !
आमच्या घरासमोरची जास्वंदच एक
.... तुझ्यासारखी गमत हुती !

व्हाळावर इलय
आनी सगळे कपडे जाळयेर टाकलय
मगे त्या गार पानयात
ह्या अंगाक लोटलंय
घळनीवरसून पोरा उडयो मारीत....
तेतूरसून माती पान्यात इली
पानी खदूळ झाला !
म्हणान मी भायर इलय आनी बघतलय तर
सुरयाचा प्रतिबिंब पानयात पडलेला
तेतूरसून तुझ्या डोळ्याचा तेज
....साऱ्या व्हाळार पसरला हुता !

≈

## आमचे बाबा / डॉ. सुनील सावंत

चिखलभरी थरातून जन्म झाला कमळाचा
मेहनतीने रचला त्यांनी मनोरा कर्तृत्वाचा !

अभिमान असा आमुच्या बाबांना मुलांचा
नेहमी रागावताना वर्षाव करतात फुलांचा !

वसा आहे त्यांचा नेहमीच अबोला धरण्याचा
प्रवृत्तीत गुण आहे मुलांशी कमी बोलण्याचा !

व्यक्तिमत्वास त्यांच्या साज आहे विविधतेचा
कधी पटणाऱ्या, न पटणाऱ्या संमिश्र विचारांचा !

उन्मळूनही सावरणारा माणूस असा धैर्याचा
सतत प्रयत्न करणारा जगासवे बदलण्याचा !

≈

## शब्द कधी संपू नयेत / डॉ. सुनील सावंत

सूर्य कधी मावळू नये
रात्र कधी होऊ नये
बहार कधीही कोमेजू नये

शब्द कधी संपू नयेत
सोबत अर्धवट राहू नये
मन कधी निजू नये

बहाणे कधी संपू नयेत
कधी तू नजरे आड होऊ नयेस
मी कधीही माझा राहू नये !

≈

## वेडं जीवन / डॉ. सुनील सावंत

रात्रीच्या काळोखात
मंद मंद जळणारे पिवळे-लाल दिवे
आणि तुझी हृदयात जपलेली आठवण
मनाला पोरकं करुन जात होती
तू माझी कुणीही नाहीस
ह्या जगातील कुणीही माणसं कुणीचीही काहीही नसतात
तरीही तुझी आठवण समुद्राच्या भरतीसारखी
मनावर तरळत राहते
मन अनंतात विलिन होते....
...तुझ्याकडून फक्त हसऱ्या आनंदाची
अपेक्षा करत... बाकी कसलीही इच्छा नसते !

जीवन सारे हासत होते....
रडता-रडता तू डोळ्यासमोर होतीस....
...हेच का ते वेडे मानवी जीवन...
... न कळणारे... दुसऱ्याला न समजणारे !
जीवनात हरविलेला आनंद अकस्मात पसरविणारे

≈

## गाऱ्हाना / डॉ. सुनील सावंत

माका म्हायत हुता
ग्वाडाच्यो ढेपी वाटनारे हात
काळाच्यो एक एक पार आसत !
तेंनी दुध वाटता वाटता
आमचा कोकन लुटल्यांनी
आता व्हयेत त्यांका कोकनातल्यो म्हशी
त्यांच्या तालार नाचनाऱ्यो !

अरे रांडेच्यानू, हात दाखून पसार झालास
म्हणान, गाव उपाशी ऱ्हवलो काय ?
नाय, उपाशी ऱ्हवली ही भात पिकवनारी आये,
तुमच्या नावानं वाळवंट झाली हा आता
पुढच्या खेपेक हय पान्याचो थेंबतरी गावात काय रे तुमका ?
तुमच्या खुर्चेबरोबर तुमचा घरदारही नष्ट होतला हा,
ह्या आमचा गाऱ्हाना हा, मावलेच्या देवळातला !

≈

## आनंदाची सीमा / डॉ. सुनील सावंत

सगळेच आनंद सगळ्यांसमोर उपभोगता येत नाहीत
म्हणूनच मी सांगतेय
कधीतरी आपण दोघेच चित्रपट बघायला जाऊ या
–आपण दोघेच पिकनिकला जाऊ या
–आपण दोघेच बागेत जाऊ या
असा निवांतपणा दोघांनीच उपभोगू या
दैनंदिन जीवनात एकांतपणा कधी लाभतच नाही
कधी सकाळ होते
अन् कधी संध्याकाळ संपते, कळत नाही
अंथरुणात पडल्यावर शेजारी मुलांची कुजबूज असते
दोघांचे विश्व अनंताने व्यापलेले असते
समुद्राच्या विराट गर्दीचे आपणास कधी भान नव्हते !
– हे एक शाश्वत सत्य उरते....
क्षणाक्षणाला सुखावणारे !

≈

## सृष्टी / डॉ. सुनील सावंत

अतृप्त मी अतृप्त तू
दाही दिशांना तृष्णा भरलेली
तिथेही सारे मळभ दाटलेले
वाट पाहत सारी सृष्टी बसलेली !

स्पर्शासाठी किरणांच्या इथे
पाखरेही घरट्यात झोपलेली
फुले इथली आठवणीत फुललेली
चंद्राच्या शीतल छायेत विसावलेली !

कधी मध्यरात्री पहाटही झालेली
पाखरांनी चोचीत चोच घातलेली
किरणांनी फुलेही फुलवलेली
सृष्टी सारी उन्हांने भारलेली !

≈

## घरटे / डॉ. सुनील सावंत

रात्र सरुन गेली तरी
फुलांच्या घरट्यात आम्ही दोघं !

पहाटे पहाटे फुले उमलताना
सुगंधाने तयांच्या जाग येते !
अन् आळसावलेली फुले
अंग फुलवत,
आम्हाला उठवतात !

रात्र झटकून आम्ही उठतो
तेंव्हा नवीन कहाणी जन्म घेते
''उद्याची पहाट आमची आहे,
'फुलांचे घरटे' आम्ही बांधणार''

–मानवी स्वप्ने बहरु लागतात....
पुन्हा एका फुलाच्या घरट्यात !

≈

## अमावस्या / डॉ. सुनील सावंत

तू जिथे थांबशील तिथे रक्त मागतील
हे मानवी वाघांचे सुपुत्र
तू जिथे चालशील तिथे अडथळे उभे करतील
पेरुन पैशाची काटेरी रात्र !

तू नोकरी करशील तिथे भ्रष्टाचार शिकवतील
तू हे सोडून हिमालय गाठण्यासाठी जाशील
तर तुलाच मारुन रक्त पितील
– एक थेंब मिळालं तरी !

न्यायाने वागणाऱ्यांना क्षुल्लक ठरवतील
अन्यायाविरुध्द लढणाऱ्यांना नष्ट करतील
व्यक्तिनिष्ठ संबंधांना रेशमी न्याय देतील
अमावस्येच्या रात्री चंद्राचीही साक्ष घेतील !

≈

## कोकणातील एकट्या म्हातारीचे गीत / डॉ. सुनील सावंत

आभाळ गं माझे
झुला होऊनी अंगणी आले
आभाळ गं माझे
फूल होऊनी मनात फुलले

डोंगर गं माझे
धुक्याच्या ढगाने झाकोळले
डोंगर गं माझे
दवं होऊनी हाती विसावले

माड गं माझे
शहाळ्याने भरुन आले
माड गं माझे
झावळ्यांनी झाकून गेले

कलम गं माझे
पानापानात मोहरले
कलम गं माझे
आंब्याआंब्यांनी डवरले

दारी गं माझे
डेलियाने ठाण मांडले
घरं गं माझे एकटीचे
रात्रीच्या अंधाराने काळोखले !

≈

## सु–नीती / डॉ. सुनील सावंत

सारं उधळून टाकावं आभाळाने
क्षितिजावर रंगाचं साम्राज्य
तसंच तुझ्या एका अस्तित्वावर
पेरुन टाकलंय पुरुषाने स्वराज्य !

पण त्या पेरण्यात 'पेरणी' नव्हतीच
कारण तुझी धरणी त्यांची नव्हती
तिच्यावर रुक्ष जीवनाची साथ होती
शिशिराशिवाय कुणाचीच सु–नीती नव्हती !

ज्यांचं जीवनच मुळी ग्रीष्मात पेटलंय
अन् पैशाच्या वसंतात उमललंय
अशांच्या उघड्या घरात शिशिरावलंय
''पण तिथं दिलं बी सौद्यात गावतंय !''

≈

## www. nature.com वेबसाईट / डॉ. सुनील सावंत

तिच्या रेशमी ओढणीच्या स्पर्शाने वेबसाईट
शेक्सपियरची सगळी तत्वे ढगाआड होतात
आणि आईनस्टाईनचे गणितशास्त्र परिघात लोप पावते
उरते एकच सत्य न्युटनचा नियमः
'ॲक्शन व्हर्सेस रिॲक्शन'
ई-मेलवरचा संदेश हाच असतो

या वेबसाईटवरील चित्रांचे
मानवाला कधीही आकलन होणार नाही !

निसर्गाच्या संगणकातील नाती व सृष्टी
अगाध आणि अथांग आहेत-
निसर्ग अजिंक्य आहे-
झुरळांच्या प्रजोत्पादनासारखा !

पृथ्वी गोल फिरते आहे !
सूर्य रोज उगवत आहेः
दिवस रात्रीचे चक्र अमर आहे !
बाकी सारं-
भूकंपासारखं अज्ञात !

≈

## नवी घटना / डॉ. सुनील सावंत

भ्रष्ट इथली नीती
पैशात गुंतली नाती
ओळखीच्या तालावर ढोल वाजविती !

सरकार अमुचे गाती
जनसामान्यांच्या जाती
लागेबांधे मंत्रालयावर तोरणे बांधती !

योजना जाहीर करती
गरीबी हटविण्यासाठी
सरकारी तिजोरीवर डोळा ठेवती !

समानतेचे रणशिंग फुंकती
निवडणुकांना सामोरे जाती
नागरिकांच्या डोळ्यांत धूळ फेकती !

स्वातंत्र्यदिनी भाषणे देती
झेंडा संध्याकाळी उतरविती
लोकशाहीच्या मनावर अक्षता पेरती !

समतेचा अणुस्फोट घडविती
अन् धनाला लगाम घालती
अशी कुणी आणेल का रणनीती !

पहारा राज्यकर्त्यांवर ठेवती
न्यायालये निर्मळ न्याय देती
अशी नवी घटना पसरेल का पृथ्वीवरती ?

≈

## पहाटस्वप्न / डॉ. सुनील सावंत

आता पावसाळी शेवटचे वारे रानावनात उधळलेले
गर्भार मातीखालचे बीज अंकुरलेले अन् ऊनाने सुकलेले !

समजू नको मला तू आता उमलणारे चांदणे
ऋतूचक्रातील बंध निर्झर आटलेले अन् मृग ओसरलेले !

उधळित नक्षत्रांच्या राशी तुझे आभाळ वाकलेले
मी कणाकणाने फुलणारी उरलेले अन् सुगंध लोपलेले !

आता नको आवरु प्राजक्ताचा सडा अंथरलेला
तुझ्या मिठीत मी उंबराचे फूल झालेले अन् क्षणात कोमजलेले !

मधुमालतीच्या वेली अंगभर विसावलेल्या दारी तेंव्हा
विळख्यात अंधाराच्या प्रतिक्षेत थांबलेले अन् बीज अंकुरलेले !

झटकून दिवसभराच्या कामाचा शीण रात्र ओढून गात्री
तुझ्या कुशीत ओलेते पाखरु झालेले अन् तांडव झंकारलेले !

आता पूर्वीची शिशिरातील गोठलेली थंडी न बोचणारी
तरीही मी अलगद फुलपाखरु झालेले अन् रंग ओठी ठेवलेले !

सखया, ऋतू ओसरु लागलेले प्रातःकाळी मावळतीच्या चंद्रासारखे
पहाटस्वप्न जागून आता अबोली मी झालेले अन् चांदणे न्हालेले !

≈

## **उद्याचा जन्म** / डॉ. सुनील सावंत

बाकी तरंग आणि वलये उमटतात
कुणीतरी किनाऱ्यावरुन दगड फेकल्यानंतर !
त्या पाण्याची खोली अमर्याद....

कुणाच्या ना कुणाच्या अस्तित्वाने पाणी वाढतच राहतं !
त्यात एक तरंग कधीतरी
शीतल हवेसोबत...प्रेमाचा वर्षाव करत...
उमटतो आणि दूर दूर किनाऱ्याकाठी पसरत जातो !

कदाचित मनाच्या समाधानी आसवांचा
पाऊस त्या प्रवाहात बरसतो.. मन तृप्त होते !
आणि त्या पाण्याला किरणांची भूक लागते
तेव्हा संथपणातून मधूनच उसळते...एक लाट
शांत होते....
संध्याकाळी खोडकर बालकासारखी
उनाडक्या करते- ती लाट !

क्षितिजावरील सूर्य त्या पाण्यावर काळी शाल पसरवून
.....निघून जातो !
निळी, कधी काळी शाल !
काळोखात सगळी दुनिया शांत पहुडते !
की 'उद्याचा जन्म' निर्माण करते !

≈

## पहिलीतील बालकांची पालक सभा / डॉ. सुनील सावंत

पहिल्या इयत्तेत शिकणारी मुलेः
त्यांच्यासाठी आयोजित पालक सभा
शाळेतील वर्गातः
''पालकांनो, कृपया लक्ष द्या''
लाऊडस्पीकरवरुन अनाऊन्समेंट:
''आपल्या बाळाला खालील गोष्टी
समजावून सांगा
व आम्ही विचारु तेंव्हा
आम्हाला किंवा वर्गशिक्षकांना
त्यांना त्या सांगायला सांगा
१. बाळाची जन्मतारीख
२. बाळाच्या घरातील कुटुंब सदस्य
३. बाळाची जात व धर्म!
४. अनुसूचित जात किंवा जमातीचे असल्यास ती माहिती !!!''
अनाऊन्समेंट बंद.
वर्गशिक्षिका पालक सभेला सुरूवात करतातः
''पालकांस नववर्षाच्या शुभेच्छा
आता ध्वनीक्षेपकावरुन दिलेली माहिती
जनगणनेसाठी हवीय !
तेव्हा आपल्या बाळाला ते शिकवा !!''

धर्म आणि जात
इयत्ता पहिलीतच शिकवली जाते
इथेच पाया घातला जातो
अपरिपक्व बालमनावर
धर्मांध जातीय विषमतेचा !
एकमेकांचे पाय ओढण्याचा !
कुठून उदय होणार माणूस धर्माचा?

बाळांना जात-धर्म नसतो
ती निष्पाप असतात
तो शिकवला जातो शाळेमधूनच
विविध सवलतींमधून
इथेच पोखरली जातात मने
जाती धर्माने !
इथेच लावला जातो धर्मांधतेचा वृक्ष !
मानव धर्माला पोखरणारा !

≈

## मुंबई : ३० नोव्हेंबर २००० / डॉ. सुनील सावंत

गर्द काळ्या काळोखात
चमचमणारे तांबूस दिवे
राणीच्या गळ्यातील माळेसारखे
आणि मोकळे रस्ते
पहाटे चार वाजता
मुंबईतील मरीन लाइन्सकडे जाणारे

संथपणे किनाऱ्यावर येणाऱ्या लाटा
शुभ्र फेसाळणाऱ्या

महालक्ष्मीच्या मंदिराकडे जाणाऱ्या वाटेवर
विरळ गर्दी
आणि मंगलमय सुवास अगरबत्तीचा.

उदात्त विचाराने, निश्चित मनाने
दूध विकणारी एक मुलगी–
दूध केंद्रावरुन
दुधाने भरलेल्या पिशव्या घेऊन निघालीय.
(हल्ली दूध केंद्रावर तूप, लस्सी इत्यादी सगळे मिळतेय)

अमेरिकन कॉन्स्युलेटला आज सुट्टी!
भारतात आज सार्वजनिक सुट्टीचा दिवस नाहीय,
तरीही!
सुट्टीचा बोर्ड किंवा सूचना कुठेही ठळकपणे नाहीय
प्रवेशद्वारावरील अनेक बोर्डांमध्ये
एक छोटा नोटीस बोर्ड सुट्ट्यांच्या तारखांचा आहे
त्यात आजची तारीख आहे:
सुट्टीचा दिवस म्हणून!

खरं तर आजचा दिवस सणाचा नाहीय
की कोणत्याही सुट्टीचा नाहीय
तरीही अमेरिकन कॉन्स्युलेटला सुट्टी आहे
जी जाहीररित्या घोषित केलेली नाहीय!
का? कोणास ठाऊक?
अनुत्तरित प्रवेशद्वारावर
प्रश्नांकित माणसे रांगेत उभी आहेत
प्रवेशद्वारावरील अबोल कुलूप
निपचित पडून आहे-
ट्यूबलाईटच्या मंद प्रकाशात
आणि तो छोटा नोटीस बोर्ड
सरतेशेवटी नजरेत सामावल्यावर
परतून जातायत अनेक माणसे
व्हिसासाठी आलेली पोकळ मनाने!

काळोख्या रस्त्यावरील
ट्यूबलाईटच्या सुस्त शुभ्रांकित प्रकाशात
सिग्नलच्या बंदावस्थेत
आम्ही रस्ता ओलांडून पलीकडे आलो
बसस्टॉपवर थांबलो
बस मिळेल म्हणून.
पण पहाटे बस कमी येतात
म्हणून
गंधमय नीलांबरी टॅक्सीतून
नरिमन पॉईंटच्या दिशेने
आम्ही निघालो-

आम्हाला यु.के. चा एक व्हिसा घ्यायचाय
'ओम जय जगदीश हरे'
हे भजन ऐकवत
टॅक्सी सुसाट पळतेय
मोकळया रस्त्यावरून
मेकर चेंबर्सच्या दिशेने....

नरिमन पॉईंटचे रस्ते अजूनही सुस्तावलेले
..अंग झटकून ...नुकतेच उठतायत
चहा विकणारी काही मुले
मेकर्स चेंबर्ससमोर उभी आहेत
त्या फूटपाथवरील दगडावर
एक मुलगा चक्क चटणी वाटतोय
-लाल मिरच्यांची!

समोरच्या फूटपाथवर
विहीरीचे पाणी हातगाडीवरील टाकीतून
पुरवणारा एक माणूस
पाण्याचे पैसे फुटपाथवरील
चहा स्टॉलवरील माणसाकडून घेत आहे
तेच पाणी बादलीत भरुन
एक उघडा पुरूष चड्डीवर
आंघोळ करत आहे - फुटपाथवरच !

आणि आम्ही रांगेत उभे आहोत-
यु.के. च्या व्हिसासाठी!

सकाळी किंवा पहाटे ६.३० वा.
एक पानवाला फूटपाथवर पानाचे दुकान मांडत आहे-
बिनदिक्कत !

आता आसमंत झोपेतून उठत आहे
सूर्याचे कवडसे अजूनही झाडात अडकलेले आहेत

साडे सात वाजता यु.के. कॉन्स्युलेटमध्ये प्रवेश मिळाला
तेव्हा फूटपाथवरुन येणारा
बटाटा वड्याचा खमंग वास
....मनाला स्पर्शून गेला!

समोरचे विधानभवनही अंग झटकून
आळोखेपिळोखे देत आहे
आणि भारतीय तिरंगा निपचित पडलाय !
वाऱ्याची झुळूकही नाहीय
यशवंतराव चव्हाणांच्या पुतळ्याने
एक पाऊल पुढे टाकून
एक पाऊल मागे ठेवलेय-
समोरच पोलिस ठाणे आहे-
बीट स्वरुपात!
त्यात पोलिस दिसत नाहीय!

सकाळचे आठ वाजतायत
मुंबईतील नरिमन पॉईंट विभाग फुलू लागलाय
नरिमन पॉईंट चौपाटीवरुन
धुक्यात हरवलेल्या इमारती
अंधुकशा दिसत आहेत
निर्मनुष्य किनाऱ्यावर
कावळ्यांची शाळा भरलीय
आता सिग्नल्स सुरू झालेत
तरीही गाड्या सुसाट पळताहेत
म्हणजे अजून मुंबई उठायची आहे की काय?

एक शहाळेवाला शहाळी मांडतोय
समुद्रावर मोठा फलक लावलाय-
फेरीवाल्यांना मनाई करणारा !
त्या बोर्डाखालीच तो शहाळी सोलतोय
आणि समुद्राच्या कठड्यावर कुणी पांथस्थ
- लघवी करतोय!
शहरात हल्ली स्वच्छतेचे बोर्ड लावलेत
अस्वच्छता पसरवणाऱ्यांना नियमानुसार दंड!

स्वातंत्र्याच्या पन्नासवर्षानंतर
मुंबई झोपेतून उठत आहे-
बाकी सगळे आलबेल आहे.

आता गाड्या बघूनच रस्ता ओलांडावा लागतोय
म्हणजे मुंबई आता जागी झालीय...

तशी मुंबई कधी झोपतच नाही-
— गोलपिठा विभाग रात्रभर जागाच असतो!
— म्हणून मुंबईत सगळे व्यवहार सुरक्षित चालतात!

≈

कविवर्य मित्र श्री. सुनील सावंत यांच्या या कविता म्हणजे त्यांच्या आजवरच्या काव्यलेखनाचा अधिक आणि वैविध्यपूर्ण असलेला आणि आजच्या कालखंडातला संमिश्र ताणतणावांनी व्यापलेल्या संवेदनाक्षम मनाचा शोधच आहे.

या अफाट मुंबई महानगरीचे आजचे जीवन अधिकच भीषण, नीरस व कमालीचे जीवघेणे होत चाललेले आहे. दिसायला मात्र या शहराला आधुनिकतेने पूर्ण वेढलेले वाटेल, परंतु एकूण मानसिकता मात्र तशीच गोठलेली आणि अप्रगत जाणवेल. या सर्वांचे चित्रण अधिक सक्षमतेने ही कविता जशी करते, तितकीच ती याही संघर्षशील व जीवघेण्या लढाईत स्वअस्मितेचा, माणसातील आंतरिक आत्मीयतेचा ओलावा टिकवून धरणारा, म्हणजे कवी सोहीरोबा अंबियेच्या शब्दातच सांगायचे तर अंतरीचा दिवा मालवू नको रे, हा उच्चारही टिकवून धरते. हा उद्‌गार माणसाला आतून टणक करणारा, बळ वाढवणारा आणि पोलादी हिंमत देणारा आहे.

आजच्या काळात जगताना जाणवलेले संवेदनांचे सर्व स्पर्श या संग्रहात शब्दांकित झालेले आहेत. असा एक सुरेख शब्दमेळ, स्वरमेळ जमून आलेला आहे. माझ्या शुभेच्छा.

**– नारायण सुर्वे**

श्री. सुनील सावंत यांचा हा कवितासंग्रह मी वाचला. त्यांच्या कविता विचार करायला लावणाऱ्या, अंतर्मुख करणाऱ्या आहेत. आपल्या भोवतीचे सामाजिक-राजकीय जीवन ते संवेदनशील मनाने न्याहाळतात. या जीवनात माणसाच्या हिताची बीजे आहेत की अहिताची याचा सखोल विचार करतात. सभोवतालची ही परिस्थिती भीतिदायक आहे. श्री. सुनील सावंत या वास्तवाकडे डोळे उघडे ठेवून पाहतात.

श्री. सुनील सावंत यांच्या कवितेतून व्यक्त होणारी स्त्री नटवी, सुखासीन बाहुली नाही. समतेच्या नव्या युगाची ती प्रतिनिधी आहे. तशी नटवी, सुखासीन बाहुली असणे हेच पुरूषाला हवे आहे याची तिला जाणीव असल्यामुळेच मी तुला आवडते म्हणजे माझं काय आवडतं? असा स्पष्ट प्रश्न ती विचारते. आपल्या व्यक्तिमत्त्वाची प्रखर जाणीव ही स्त्री व्यक्त करते.

श्री. सुनील सावंत यांची भाषा सरळ-साधी आहे. शाब्दिक युक्त्यांवर तिचा भर नाही. तिचे बळ तिच्या आशयात ती शोधते.

**– मंगेश पाडगांवकर**

9 789380 248134

वंदना प्रकाशन
मुंबई

₹ 250/-